cmyk

## संपादकीय

### विरोधकांना आव्हान आणि संधीही

विरोधी पक्षातील कोणीही एखादा आरोप केल्यानंतर त्यांना न मिळणारा प्रतिसाद नजरेत भरणारा आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत विरोधी पक्षाच्या आमदारांनी नेत्यांना रडत बसता येणार नाही. त्यांचा आकडा कमी आहे म्हणून ते गप्प बसू शकत नाहीत. लोकांनी त्यांना दिलेली जबाबदारी पार पाडावी लागेल. इथे त्यांना आव्हान आहे तशी संधीही आहे. फक्त त्यांच्यात धाडस किती आहे त्याची परीक्षा यंदाच्या पंचवार्षिकात होणार आहे. त्यासाठी त्यांना शेकाप पक्षाच्या नेत्यांची आठवण काढावी लागेल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### राजधानी दिल्ली पुन्हा वायू प्रदूषणाच्या विळख्यात

नवी दिल्लीः वायू प्रदूषणात वाढ झाल्याने, शनिवारपासून दिल्ली-एनसीआरमध्ये श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेचा पहिला टप्पा लागू झाला आहे. केंद्रीय वायु गुणवत्ता व्यवस्थापन आयोगच्या उपसमितीने देखील लोकांना नागरिक सनद स्वीकारण्यास सांगितले आहे. शनिवारी, दिल्लीचा एक्युआय २०९ नोंदवण्यात आला. ग्रेप-१ लागू झाल्यानंतर, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्ये कोळसा आणि लाकडाच्या वापरावर पूर्णपणे बंदी असेल. समितीने म्हटले आहे की, जोरदार वाऱ्यात उडणाऱ्या धुळीमुळे प्रदूषण वाढले आहे. ग्रेप-१ उपायांतर्गत, जुन्या पेट्रोल आणि बीएस-४ डिझेल वाहनांवर कडक देखरेख केली जाईल. कचराकुंडीतून घनकचरा, बांधकाम कचरा आणि धोकादायक कचरा नियमितपणे उचलण्याची खात्री करावी लागेल.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-४६ | सोमवार, दि.९ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# सोयाबीनच्या अनुदानित बियाणे वाटपात घोळ !

## ७५ किलोचे आश्वासन असताना केवळ ६६ किलो बियाणाचे वितरण; शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

**पुणे । प्रतिनिधी**

**खरीप हंगाम सुरू होण्याच्या तोंडावर राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोफत दिल्या जाणाऱ्या सोयाबीन बियाण्याच्या वितरणात गोंधळ उडाला आहे. ७५ किलो बियाण्याचे आश्वासन दिलेले असतानाही अनेक शेतकऱ्यांना केवळ ६६ किलोच बियाणे मिळत असल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाबीज आणि कृषी विभागातील समन्वय अभावामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप होत आहे.**



अनेक ठिकाणी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या शेतकऱ्यांची ऑनलाईन लॉटरीद्वारे निवड झाली त्यानुसार बियाण्याचे वाटप नियोजित होते. प्रत्यक्षात अनेकांना मंजूर प्रमाणापेक्षा ९ किलोपर्यंत कमी बियाणे मिळाले आहे. ७५ किलो मंजूर असूनही ६६ किलो बियाणे मिळाल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर स्वाभिमानी क्रांतिकारी शेतकरी संघटनेनेही अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला आहे. बीड मध्येही महाबीजकडून केवळ २२ किलो बॅगच वितरित केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या ३०, २५ व २२ किलो बॅगच्या मान्यतेनुसार वाटप होणे अपेक्षित असतानाही बीडमध्ये फक्त २२ किलोच्या बॅगा शेतकऱ्यांना देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना ९ किलो बियाण्याचा फटका बसत आहे. याबाबत आमदार श्वेता महाले यांनी तातडीने कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी महाबीजच्या हलगर्जी कारभाराचा निषेध करत दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. बॅग फोडण्यास कायदेशीर बंदी असल्याने अचूक प्रमाणात वाटप होत नाही. यामुळे अनेक शेतकऱ्यांना १-२ किलोने कमी बियाणे मिळत आहे. राज्यातील अनेक शेतकरी संघटना व राजकीय नेते या प्रकरणात सक्रिय झाले असून दोषींवर तातडीने कारवाई करावी, आणि उर्वरित बियाणे ◀◀ पान २ वर

### हेक्टरी ९९० रुपयांचे बियाणे गायब

शासन १०० टक्के अनुदानाने ७५ किलो बियाण्यासाठी महाबीजला ८ हजार २५० रुपये देते. परंतु, केवळ ६६ किलो बियाणेच दिले जात असल्यामुळे हेक्टरी ९९० रुपयांचे बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. या बियाण्यांच्या पिशव्या साथी पोर्टलवर नोंदणीकृत असून, त्यावर कोड दिला आहे. हा स्कॅन केल्यास त्या बियाण्याची उत्पत्ती, प्रक्रिया आणि तपासणी याबद्दल सविस्तर माहिती मिळते. मात्र, पिशवीत प्रत्यक्ष वजन किती आहे, हे त्या माहितीमध्ये स्पष्ट होत नाही, हे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# महाराष्ट्रात १२ ते २० जून मुसळधार पाऊस

## तळी भरुन वाहणार; शेतकऱ्यांना शेतीकामे उरकण्याचा सल्ला



**मुंबई । प्रतिनिधी**

**यंदा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच मान्सूनचे जोरदार आगमन झाल्याचे पाहायला मिळाले. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला, त्या पावसाने अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे नुकसान झाले.**

मे महिन्यातील जोरदार पावसानंतर पावसाने दडी मारली असून, राज्यभरातील बहुतांश भागात विश्रांती घेतली आहे. त्यातच, हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी १२ तारखेच्या पुढे महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडणार असल्याचे भाकीत केले आहे. १२ ते २० जून या कालावधीत मोठा पाऊस येणार असून, जेव्हा मान्सून पूर्वेकडून येतो तेव्हा बीड, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात मुसळधा पाऊस ◀◀ पान २ वर

# गौरव एक्स्प्रेस ९ जूनला मुंबईतून रवाना!

## सफर शिवरायांच्या इतिहासाची, सीएसटी येथे मुख्यमंत्री दाखविणार झेंडा

मुंबई । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक वर्धापन दिनानिमित्त भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ लिमिटेड (आयआरसीटीसी) छत्रपती शिवाजी महाराज सर्किट भारत गौरव ट्रेन टूर सुरु करण्यात आली आहे. या ट्रेनच्या प्रवाशांना ५ रात्री आणि ६ दिवस अशा प्रवासात महाराजाच्या जीवनातील ऐतिहासिक घडामोडी, पर्यटन स्थळांचा समावेश केला आहे. या गौरव एक्सप्रेस ट्रेनला १०० टक्के बुकींग मिळाले आहे. सोमवारी दि.९ जून २०२४ रोजी सकाळी ६ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सीएसएमटी फलाट क्रमांक १८ वरुन हिरवा झेंडा दाखवून ट्रेन रवाना करणार आहेत.

या ट्रेनमधून सुरुवातीला ७१० प्रवाशांनी बुकींग केलेले आहे. त्यातील ४८० प्रवासी इकॉनॉमी (स्लीपर) मध्ये, १९० प्रवासी कम्फर्टमध्ये आणि ४० प्रवासी सुपीरियर मधून प्रवास करणार आहेत. भारत गौरव ट्रेन टुरची योजना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक वर्धापन दिनानिमित्ताने सुरु केली आहे. या ट्रेनचा प्रवास पाच रात्री तर सहा दिवस असा असणार आहे. छत्रपती ◀◀ पान २ वर

# फडणवीस यांचा लेख हास्यास्पद

## हर्षवर्धन सपकाळ यांची खोचक टीका, राहुल गांधी यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यास भाजपाकडून टाळाटाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतांच्या चोरीच्या प्रश्नावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लेख लिहून काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पण त्याची मिरची मात्र भाजपाला लागली. प्रश्न निवडणूक आयोगाला विचारले आहेत, त्याची उत्तरे त्यांनी देणे अपेक्षित असताना भाजपा नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेख लिहून उत्तरे दिली आहेत. फडणवीस यांचा लेख हास्यास्पद असून राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुद्देसुद उत्तरे देण्याऐवजी टीका करत जनतेला भ्रमित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे, असे सडेतोड उत्तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले.**





टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ देवेंद्र फडणवीस यांच्या लेखाची चिरफाड करताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस व भाजपा युती हीच मतांच्या चोरीचे लाभार्थी आहेत, ते आरोपी आहेत, सत्तेचा मलिदा लाटत आहेत आणि तेच उत्तरे देत आहेत.

### “ एस.चोकलिंगम, किरण कुलकर्णी यांची नार्को टेस्ट करा

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राहुल गांधी मीडियाकडे का जातात, या निवडणूक आयोगाच्या प्रश्नालाही उत्तर दिले. मीडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हे आयोगाला मान्य नाही का? आणि काँग्रेस पक्ष व राहुल गांधी यांनी विचारलेल्या प्रश्नांना वस्तुनिष्ठ उत्तरे आयोगाने द्यावीत असे स्पष्ट करत, तसेच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम व तत्कालीन अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांची नार्को टेस्ट करा, महाराष्ट्रातील मतांच्या चोरीचे सत्य उघड होईल अशी मागणीही यावेळी सपकाळ यांनी केली.

तुम्ही रामशास्त्री प्रभूणेंच्या अविर्भावात वावरू नका, तुमचा कारभार तर घाशिराम कोतवालचा आहे. फडणवीस यांनी दिलेली उत्तरे ही थातूरमातूर आहेत. फडणवीस हा माणूस अत्यंत खोटारडा आहे. वेगळा विदर्भ झाल्याशिवाय लग्न करणार नाही. अजित पवार व राष्ट्रवादी बरोबर कधीच जाणार नाही, छगन भुजबळ यांच्यावर गंभीर आरोप केले, त्यांची जागा जेलमध्येच आहे हे सांगणारे, नारायण राणेंवरही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करणारे हे तेच फडणवीस आहेत जे आज अजित पवार, नारायण राणे व भुजबळांना शेजारी घेऊन बसले आहेत. ◀◀ पान २ वर

# स्व.आर.टी. जिजा संयम आणि निष्ठेचे प्रतिक होते!

## गंगापूजन कार्यक्रमात पंकजाताई मुंडे यांनी दिला आर.टी. देशमुख यांच्या आठवणींना उजाळा

परळी वै.। प्रतिनिधी

माजी आमदार आर.टी. देशमुख यांच्या गोडजेवण कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात त्यांनी देशमुख यांच्या स्मृतींना उजाळा देताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, संयम, निष्ठा, प्रेम आणि जिव्हाळा म्हणजेच आर.टी. देशमुख जिजा होते. त्यांच्या अचानक निधनाने मला मोठा धक्का बसला. ते केवळ राजकीय सहकारी नव्हते, तर माझ्यासाठी एक भावनिक आधार होते. मी अनेक वेळा अडचणीत असताना त्यांनी मार्गदर्शन केलं. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही चिंता दिसली नाही. अत्यंत शांत, संयमी आणि ◀◀ पान २ वर

### शिंगारवाडीत वीस वर्षीय तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

शिरूर । प्रतिनिधी

**तालुक्यातील शिंगारवाडी येथील वीस वर्षीय तरुणाने राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवार दि. ७ जून रोजी सायंकाळी उघडकीस आली असून आज रविवार दि.८ जून रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. मात्र या तरुणांच्या आत्महत्या करण्या पाठीमागचे कारण स्पष्ट झाले नसल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.**



शिरूर कासार तालुक्यातील तिंतरवणी ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या शिंगारवाडी या गावातील अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा रामेश्वर नारायण कोळेकर (२०) हा आई-वडिलाला तीन बहिणीच्या पाठीवर एकुलता एक मुलगा होता. ◀◀ पान २ वर

# राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाच्या चर्चेला वेग

## सुप्रीया सुळे म्हणाल्या, दहा जूनपर्यंत वाट पाहा

**पुणे । प्रतिनिधी**

**थोरले आणि धाकले पवार एकत्र आले तर त्यात आक्षेप घेण्याचे काहीही कारण नाही, अशा प्रतिक्रिया दोन्ही पक्षातील नेत्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत. असे असतानाच अजित पवार यांच्या पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी आषाढी एकादशीपर्यंत वाट पाहा, असे मोठे विधान केले आहे. त्यांच्या याच विधानावर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली असून त्यांनी सुध्दा १० जूनपर्यंत वाट बघण्याचे म्हटल्याने राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाचे संकेत मिळाले आहे.**



अजित पवार गट आणि शरद पवार गट अर्थात दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाच्या चर्चांना सध्या चांगलीच हवा मिळालेली आहे. दोन्ही पक्षातील नेते थेट आणि उघडपणे एकत्र येण्याबाबत विधाने करताना दिसत आहेत. दोन्ही पक्षांनी एकत्र आले पाहिजे. खासदार सुप्रिया सुळे यांनी अमोल मिटकरी यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. कोणताही निर्णय घेण्याआधी पक्षातील शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेतले जाईल. ◀◀ पान २ वर

### आसाममध्ये महापुरामुळे २३ मृत्यू

**गुवाहाटी । वृतसंस्था**

आसाममधील पूरस्थितीत थोडी सुधारणा झाली असली तरी राज्यातील १२ जिल्ह्यांमधील सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या तडाख्यात आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. सरकारी बुलेटिननुसार, आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.०० क्विंटल | २,२०० | २,६६१ | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड: १८२.५० क्विंटल | १,९०१ | २,८०१ | २,३८१ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,४२१ | ६,४५० | ६,४४० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७५.०० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,३४० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,३४६ | ५,३४६ | ५,३४६ |

# कोणताही निधी बेकायदेशीररित्या वळवलेला नाही

## लाडकी बहीण योजनेवरून मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘लाडकी बहीण’ योजनेच्या निधी वाटपावरून सध्या राजकीय वर्तुळात चांगलाच गदारोळ निर्माण झाला आहे. या योजनेसाठी इतर विभागांचा निधी वळवण्यात आल्याचा आरोप मंत्र्यांसह विरोधकांनी केला असून, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात स्पष्टीकरण दिले असून, लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्याही विभागाचा निधी वळवलेला नाही, असा खुलासा केला आहे.**



सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा ४१० कोटी रुपयांचा निधी वळवला होता. यानंतर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनीही याबाबत नाराजी व्यक्त करत थेट ‘‘जर निधीच मिळणार नसेल, तर विभाग बंद करा,’’ असा संताप व्यक्त केला होता. त्यानंतर आदिवासी कल्याण विभागाचे ३३५ कोटी रुपये देखील लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात आला. फडणवीस म्हणाले, आपल्या अर्थसंकल्पाच्या नियमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना त्यांच्या हेडखालीच दाखवाव्या लागतात. त्याची तरतूद ही त्या हेड खालीच करावी लागते. म्हणूनच अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना त्या हेड खाली ती तरतूद केली आणि भाषणात सांगितले की आम्ही रेग्युलर तरतुदी पेक्षा किती जास्तीची तरतूद केलेली आहे आणि ती कशाकरता वापरणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस पुढे म्हणाले, जेव्हा ◀◀ पान २ वर

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू

## अंत्ययात्रा निघाली तरी मागे न हटण्याचा निर्धार



**अमरावती । वृतसस्था**

**शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तसेच शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ आणि दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे बेमुदत अन्नत्याग करणार आहेत. मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीजवळ रविवारपासून (८जून) आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे.**

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विरोधकांना आव्हान आणि संधीही

विरोधी पक्षातील कोणीही एखादा आरोप केल्यानंतर त्यांना न मिळणारा प्रतिसाद नजरेत भरणारा आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत विरोधी पक्षाच्या आमदारांनी नेत्यांना रडत बसता येणार नाही. त्यांचा आकडा कमी आहे म्हणून ते गप्प बसू शकत नाहीत. लोकांनी त्यांना दिलेली जबाबदारी पार पाडावी लागेल. इथे त्यांना आव्हान आहे तशी संधीही आहे. फक्त त्यांच्यात धाडस किती आहे त्याची परीक्षा यंदाच्या पंचवार्षिकात होणार आहे. त्यासाठी त्यांना शेकाप पक्षाच्या नेत्यांची आठवण काढावी लागेल. कृष्णाराव धुळप, दत्ता पाटील, दि. बा. पाटील, उद्धवराव पाटील, गणपतराव देशमुख, केशवराव धोंडगे यांनी आपल्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणा विरोधात आक्रमकपणे लढा दिला. सर्वसामान्यांचे प्रश्न केंद्रस्थानी आणले.

खुद्द पवार आपल्या राजकीय कारकीर्दीच्या अंतिम काळात संन्यास घेऊन मुलीला पुढे ढकलतील आणि त्यांच्याकडून निर्णय घ्यायला लावून आपल्या कार्यकर्त्यांना अजित पवारांच्या माध्यमातून भाजपशी जोडून घेतील अशी गल्ली कोपऱ्यावरच्या कट्ट्यावर चर्चा सुरू आहे. ती सत्य होते का ते १० जून या राष्ट्रवादीच्या स्थापना दिनी स्पष्ट होईलच. अशा काळात पवार आपल्या सोबत असणार नाहीत असे समजून लढायची शिवसेना आणि काँग्रेस या पक्षांची तयारी आहे की नाही? राज ठाकरे आणि तशाच पद्धतीने लढणारे डावे आणि अनेक घटक यांना आपल्या सोबत जोडून घेऊन विरोधकांची शक्ती उभी करता येते की नाही? हा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर ठामपणे देताना हे नेते दिसत नाहीत. राज्यातील या विजोड विरोधकांची एकी लोकांनी मान्य केली आहे. आता खरे तर त्यांना पुढे जाण्यासाठी अनेक मुद्दे वाट पाहत आहेत. उद्धव ठाकरे यांनी लोकांच्या मनात असेल त्याप्रमाणे मनसेला निमंत्रण जाईल असे सूचक वक्तव्य केले आहे. त्यांची युती होईल की नाही हा मुद्दा अजूनही अधांतरी आहे. हिंदी विरोधातून तो स्पष्ट होतो का सरकार हा मुद्दा मागे घेऊन त्यांना प्रसन्न करून घेते हे पहायचे. पण, काँग्रेस आणि ठाकरे शिवसेना यांना आपली भूमिका स्पष्टच ठेवावी लागेल. त्यांच्यासाठी अदानी यांना धारावी पुनर्विकास प्रकल्प व इतर प्रकल्पाच्या नावाखाली मुंबईची ६४० एकर जमीन शिवाय इतर किती जमीन दिली हे सरकार गुलदस्त्यात ठेवत आहे. २० हजार कोटीचा हा प्रकल्प सांगितला जात असला तरी त्याची व्याप्ती प्रत्यक्षात खूप मोठी आहे, त्यातील बारकावे लोकांच्या ध्यानात आणून द्यावे लागतील. २.८ लाख कुटुंबांना घरे आणि व्यावसायिकांना जागा देऊन प्रकल्प होण्यामधील अनेक प्रश्न विरोधकांसाठी महत्त्वाचे आहेत. शिवाय अदानी यांना सौर ऊर्जा, नवी मुंबई विमानतळ, बंदर विकास यासाठी हजारो एकर जमिनीचे तपशील सरकारने जाहीर केले नाहीत.

मित्तल परिवाराच्या अवादा सौर प्रकल्पासाठी राज्यभर १ रुपया इतक्या नाममात्र दरात दिलेली हजारो एकर १०० वर्षांच्या भाडे तत्वावर सरकारी जमीन, प्रकल्प झाले नाहीत तर ती जमीन गावांना परत मिळणार का? असे अनेक मुद्दे आहेत ज्यांचा जाब जनतेच्या वतीने विचारला पाहिजे. वीज मीटर बाबतच्या तक्रारी, अधिकाऱ्यांनी शेती पंपांचे कापलेल्या कनेक्शन पुन्हा सुरू करण्यास टाळाटाळ याशिवाय सरकारच्या अंतर्गत कुरघोडीचे मुद्दे आहेतच. पण, विरोधकांची भूमिका अद्याप स्पष्ट होत नाही. समृद्धीवर गाडी चालवता चालवताच फडणवीस यांनी शक्तिपीठ पण पूर्ण करणार असे सांगून विरोधकांना खिजवले आहे. ते त्यांच्या आव्हानाचा सामना कसा करतात ते पहायचे.



## पारंपारिक पिकाबरोबर फुल शेती हा जोड व्यवसाय शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणार- डॉ.फिरके

घाटसावली । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियान २०२५ व महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे तालुका कृषी अधिकारी बीड अशोक साळी मंडळ कृषी अधिकारी बीड दोन भाऊसाहेब सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गावागावात ३० कलमी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे या कार्यक्रमांतर्गत आय सी आर पुणे चे डॉक्टर डी एम फिरके यांनी मोजे कुमशी खापर पांगरी व नामलगाव येथे मार्गदर्शन केले यामध्ये शेतीमधील पारंपारिक पिकाबरोबर निशिगंध अस्टर गलांडा सारख्या फुल पिकाची शेती शेतकऱ्यांना फायदेशीर असल्याबाबत माहिती दिली तसेच बियाण्याचे कंद उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले यावेळी आयसीआय पुण्याचे डॉक्टर तारकचंद सहा केवीके खामगावचे हनुमान गरुड व प्राध्यापक जगताप साहेब उपस्थित होते शेती पिकाची विविध तंत्रज्ञानाबाबत गरुड सर यांनी मार्गदर्शन केले कृषी विभागातील प्रशांत नाळपे उप कृषी अधिकारी यांनी सोयाबीन उगवण क्षमता चाचणी व बीज प्रक्रिया बाबत मार्गदर्शन केले सहाय्यक कृषी अधिकारी आर एम बोत्रे यांनी हुमणी किड नियंत्रण बाबत माहिती दिली मोनिका हिंगे यांनी बियाणे घेताना घ्यावयाची काळजी बाबत माहिती दिली यावेळी थोरात मॅडम व कोंडीराम निकम गोवर्धन ढोरमारे विनोद काशीद भगीरथ करपे राम माने, अमोल शेंडगे संदीप चव्हाण नारायण शिंदे शिवदास शेळके गोविंद शेळके संभाजी डोळस सह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# भविष्यात बीड जिल्ह्याची ओळख एक आदर्श जिल्हा म्हणून झाली पाहिजे-माजी आ.अ‍ॅड.उषाताई दराडे

## पुरस्कार प्राप्त आणि निवड झालेल्या पत्रकारांचा दराडे कुटुंबियांच्या वतीने यथोचित सत्कार

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा हा पुरोगामी आणि डाव्या विचारसरणीचा जिल्हा आहे. उगीच होत असलेली बदनामी आता थांबवणे गरजेचे आहे.बीड जिल्ह्यात कधीही जातीवाद नव्हता मागील काही दिवसात जी काही विषवल्लींनी पेरली आहे, त्यामुळे बीड जिल्ह्याची नाहक बदनामी मोठ्या प्रमाणावर झाल्याने बीड मधील रहिवासी असलेल्या व्यक्तींना परजिल्ह्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. भविष्यात ही परिस्थिती बदलण्यासाठी आता प्रत्येकांनीच जबाबदारीने पावले उचलणे गरजेचे आहे.त्यामुळेच मी बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रांमध्ये चांगली गुणी लोक आहेत. त्यापैकी सर्वप्रथम मी पत्रकारिता क्षेत्रांमध्ये असलेल्या गुणवंतांचा सत्कार करून सुरुवात करत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या माजी आमदार अँड उषाताई दराडे यांनी व्यक्त केले.**





बीड येथील उषा निवासस्थानी माजी आमदार अँड उषाताई दराडे परिवाराच्या वतीने पत्रकारांचा कौटुंबिक सत्कार सोहळा रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी जेष्ठविधीज्ञ अँड मोतीरामजी दराडे तसेच पोस्कोच्या जिल्हा सरकारी वकील अँड मंजुषाताई दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकारांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. शाल, पुस्तक आणि मोगऱ्याचे सुंदर झाड भेट देऊन पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल वैभव स्वामी तसेच राज्यपालांच्या शुभहस्ते वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार प्राप्त पत्रकार दैनिक दिव्य मराठीचे अमोल मुळे, ऑरगॅनिक शेतीनिष्ठ युवा शेतकरी शिवराम घोडके या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यानंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये आमेर हुसेन यांना जय महाराष्ट्र न्यूज चैनल मध्ये तर हरिदास तावरे यांना लोकशाही न्यूज चॅनेल मध्ये आणि आकाश सावंत यांना एनडीटीवी न्यूज चैनल मध्ये नव्याने काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अमजद खान, तसेच जिल्हा सरचिटणीसपदी शेख वसीम, महिला जिल्हाध्यक्षपदी शेख आयेशा,महिला सरचिटणीसपदी प्रा. अनुप्रिता मोरे, जिल्हा संघटक पदी रईस खान, जिल्हा उपाध्यक्षपदी शेख आयुब, तसेच उपाध्यक्षपदी अमोल शिंदे आणि दत्ता काटे यांची निवड झाल्याबद्दल दराडे कुटुंबाच्या वतीने शाल पुस्तक आणि मोगऱ्याचे सुंदर झाड भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

# आष्टीत माजी विद्यार्थ्यांची २८ वर्षांनी पुन्हा भरली एकदिवसाची शाळा

## १९९७ दहावी बॅच मधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दिला जून्या आठवणींना उजाळा

बीड । प्रतिनिधी

तब्लल २८ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची पुन्हा एकदा आष्टीत शाळा भरली. बेचाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी शाळेतील बाकांवरच्या मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. निमित्त होते आष्टी शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळा आष्टी,श्री गणेश विद्यालय आष्टी,पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या चार शाळेतील इयत्ता दहावीच्या १९९७ वर्षातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर स्नेहसंमेलन शनिवार दि.७ जून रोजी आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स येथे पार पडले.यावेळी तब्बल चार शाळेतील २० गुरूवर्य शिक्षकांना साल,सन्मानपत्र,गुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या गेट-टुगेदर स्नेहसंमेलनात तब्बल १२० विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.तर २० शिक्षक व शिक्षीका यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या अगोदर काही शिक्षकांचे निधन झाले अशांना व बॅचमधील ज्या मित्रांचे दुर्दैवाने निधन झालेली आहेत अशा सर्व मित्र-मैत्रिणींना व युद्धातील शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात केली. तब्बल २८ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांना एकमेकांना पाहून खुप आनंद वाटला. सर्व विद्यार्थी आपापल्या विविध क्षेत्रात काम करत असून आजच्या कार्यक्रमासाठी वेळ काढून हे सगळे विसरून फक्त सर्व विद्यार्थी म्हणूनच एकत्र आले होते. या गेट-टुगेदर साठी जवळजवळ पंधरा ते वीस दिवसांपासून सर्व स्थानिक विद्यार्थी यांचे नियोजन चालू होते. आज त्या नियोजनाला मूर्तीमंत रूप आले. तब्बल एक वर्षांपूर्वी सर्व दहावीच्या १९९७ च्या बॅचने एकत्र येण्याची संकल्पना आष्टी येथील चार हि शाळेतील मित्रांनी बोलून दाखवली होती. व त्यासाठी सर्वच जण सतत कार्यरत असलेले स्थानिक मित्र-मैत्रिणी यांना कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून कार्यक्रमाचे आयोजन कसे चांगले करता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. जवळजवळ महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात विद्यार्थी राहत असल्यामुळे सर्वांचे नंबर कलेक्ट करणे त्यांना वेळोवेळी कॉन्टॅक्ट करून कार्यक्रमाविषयी आस्था निर्माण व्हावी यासाठी वेळोवेळी संपर्क साधून ''१९९७ बॅच'' हा व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला व त्या ग्रुपवर नंतर सगळ्या मित्रांना ऍड करून ग्रुप चालू झाला व त्यावर गेट-टुगेदर च्या कार्यक्रमाची सूचना व फायनल तारीख सर्वांच्या मते ठरवण्यात आली. तो आनंदाचा दिवस उजाडला कार्यक्रमाचे ठिकाणी विद्यार्थी पोहोचल्यावर प्रथम त्यांच्याकडून स्वतः सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणची माहिती रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली.त्यानंतर सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना फेटा बांधून वाजत गाजत शाळेसारख्या लाईनीमध्ये लॉन्समध्ये प्रवेश करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यात सर्वांचा परिचय करून घेण्यात आला.त्यानंतर काही शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सकाळी नाश्त्याचा कार्यक्रम झाल्यानंतर व दुपारी भोजनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर दुपारच्या सत्रातही. या सगळ्या गोष्टींमध्ये सर्व विद्यार्थी आपलेआजचे वय सध्या जगण्याची सगळे टेन्शन विसरून खरंच परत एकदा त्या काळातील विद्यार्थीच झाले होते.त्यांच्या चेहऱ्यावरच्या आनंद दिसत होता. सगळे एकमेकांना जुन्या गोष्टीची आठवण करून देऊन जुने किस्से सांगत होते.यानंतर सर्वच विद्यार्थ्यांनी डिजेच्या विविध गाण्यांवर मनसोक्त नाचण्याचा आनंद लुटला. आणि सर्व विसरूनच गेले होते जणू २८ वर्षात राहिलेल्या सर्व गोष्टी जणू सर्व विद्यार्थी आजच्या कार्यक्रमात भरूनच काढत होते.हा गेट-टुगेदरचा कार्यक्रम सुरळीत व्हावा यासाठी स्थानिक विद्यार्थी राजीव नरवडे,अविनाश कदम,शरद रेडेकर,राजु गोल्हार, राहुल भोसले, प्रितम कासवा, संतोष कदम,शरद गायकवाड,डॉ रामदास सानप,राजु कारंडे,राहुल निकाळजे,शहादेव धनवडे,महेश टेकाडे,रोहिदास पवार,अमृत वाढरे, नितिन सायकर, डॉ प्रियंका हंबर्डे,अश्विनी निबोरे,मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर,अर्चना पांडव,अंबिका जगताप,रूपाली मेहेर, प्रियंका मेहेर,चंदा धनवडे,हारूबाई सुळे यासह सर्व विद्यार्थी मित्रांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षक संपत गायकवाड हे होते.यावेळी शिक्षक प्रल्हाद काळे,महादू शिंदे, लहु करपे,वामण निकाळजे, शिक्षिका विजया संत्रे, मुक्ता बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले शेवटी अध्यक्ष भाषण संपत गायकवाड यांचे झाले. तर विद्यार्थी मधून डॉ मुकुंद विधाते, प्रकाश हंबर्डे, डॉ फेरोज तांबोळी,प्रितम कासवा,शरद रेडेकर,अतुल मुळे व विद्यार्थीनींनी मधून डॉ प्रियंका हंबर्डे, मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल निकाळजे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी तर आभार अविनाश कदम यांनी मानले.व या धावपळीच्या जगात वर्षातून एकदा तरी सर्व मित्रांनी एकत्र येण्याचे ठरवून कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या व आनंदात यशस्वीरित्या पार पडला.व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. शिक्षक संपत गायकवाड, पोपटराव भोसले,अशोक काकडे, रामराव चव्हाण, प्रल्हाद काळे, महादू शिंदे, चांगदेव सातव, लहु करपे,वामन निकाळजे, रमेशसिंह देसुरकर, जी.एम भागवत, भाऊसाहेब जगताप, सुनील काकडे, दादासाहेब खाडे, मधुकर सोळसे,संभाजी नवसुपे, शिक्षिका विजया संत्रे, मंगलप्रभा गर्जे,निर्मला सोले, मुक्ता बनसोडे या २० शिक्षक गुरूवर्य यांना साल, गुच्छ, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# पान १ वरून...

### महाराष्ट्रात १२ ते २०

पडतो. सध्या पाऊस उघडल्याने शेतकऱ्यांनी शेतीतली सर्व कामे उरकून घ्यावीत, कारण १२ ते २० जून या कालावधीत राज्यभरात मुसळधार पाऊस पडणार आहे, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. पूर्व विदर्भ,पश्चिम विदर्भ, कोकण, खान्देश, मराठवाडा सगळीकडेच १२ जूनपासून पाऊस पडणार आहे. आजपासून या पावसाला सुरुवात होणार असून पुढील ४ दिवसांत हा पाऊस वाढत जाणार आहे. त्यामुळे, १२ तारखेपर्यंत पेरणी करू शकता, सोयाबिन पेरणाऱ्यांनी १२ तारखेच्या एक दिवस अगोदपर्यंतच सोयाबिन पेरणी करावी, असे आवाहन डख यांनी केले आहे.

-----------

### सोयाबीनच्या अनुदानित बियाण

शेतकऱ्यांना द्यावे, अशी मागणी करत आहेत. खरीप हंगामाच्या सुरुवातीला निर्माण झालेला हा गोंधळ तातडीने सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. महाबीज या शासनमान्य संस्थेकडून हे बियाणे पुरवले जात आहे. एकूण ७५ किलो बियाण्याची गरज असताना, महाबीजकडून २२ किलो वजनाच्या तीन बॅगा देण्यात येतात. पण प्रत्यक्षात प्रत्येक बॅग फक्त १९ किलो वजनाची असल्याचा शेतकऱ्यांचा दावा आहे. यामुळे एकूण ९ किलो बियाण्याचा फटका बसतो.

------------

### फडणवीस यांचा

आता चक्की पिसिंग, पिसिंग नाही तर त्यांच्यासोबतच मिक्सिंग व फिक्सिंग सुरु आहे. भ्रष्ट मंत्र्यांना क्लिन चिट देण्यात ते पटाईत आहेत. आता तर त्यांनी निवडणूक आयोगालाही क्लिन चिट देऊन टाकली, त्यामुळे संशय अधिक बळावला आहे. 'दाल में कुछ काल नही' तर सर्व दाळच काळी आहे, अशी खोचक टीकाही यावेळी केली. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आजपर्यंत ज्या मुद्द्यांची मांडणी केली ते काळाच्या कसोटीवर खरे ठरले आहेत. चीनचा भारताला धोका आहे, असा इशारा दिला होता, आता चिनी ड्रॅगन भारताला विळखा घालत आहे. नोटबंदीचा अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होईल जीडीपी कमी होईल असे सांगितले, ते खरे ठरले. कोरोना मुळे मोठा धोका असल्याचा इशारा दिला होता, पण भाजपा सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले, त्याचे गंभीर परिणाम भारताला आज भोगावे लागत आहेत. आताही निवडणूक आयोगाच्या एकूणच प्रक्रियेवर शंका उपस्थित होत आहे. लोकशाही व्यवस्थेचा हा प्रश्न आहे, त्या शंकांचे निरसन करण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे, पण आयोग उत्तर देत नाही, सीसीटीव्ही फूटेज देत नाही, उलट नियम बदलून टाकले. निवडणूक आयुक्त नियुक्तीवर फडणवीस बोलले पण काँग्रेसच्या काळातच टी. एन. शेषन आयुक्त झाले त्यांनी आचारसंहिता काय असते ते दाखवून दिले. पण भाजपाच्या मोदी सरकारने तर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती पॅनलमधून सरन्यायाधीश यांना वगळून आपल्याच एका मंत्र्यांची त्या जागी वर्णी लावली हे सांगण्यास फडणवीस विसरले आहेत. फडणवीस यांचा लेख हा सारवासारव करणारा आहे, कदाचित दिल्लीतील 'आका'ने सांगितल्याने हा लेखप्रपंच केला असावा. त्यांच्या लेखाला लेखाने उत्तर देण्याची गरज वाटत नाही, त्यावर एखाद्या चारोळीतूनच उत्तर दिले जाऊ शकते, असा टोलाही फडणवीस यांना त्यांनी लगावला. शेवटी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आपण गडचिरोलीला गेले होतो असे फडणवीस सांगत आहेत पण ते गडचिरोलीला का जातात तर तिथल्या खाणीतून मोठा मलिदा मिळतो, त्यासाठी ते वारंवार तेथे जातात व त्यासाठीच त्यांनी गडचिरोलीचे पालकमंत्रीपद घेतले आहे. आम्ही मात्र गडचिरोलीला जाऊन मतांच्या चोरीविरोधात जनजागृती करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

------------

### गौरव एक्स्प्रेस ९ जूनला

शिवारायांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी ही ट्रेन ९ जून रोजी रायगडला पोहचणार आहे. महाराष्ट्र सरकार आणि भारतीय रेल्वेने संयुक्तपणे ही ट्रेन सुरु केली आहे. या ट्रेनद्वारे प्रवाशांना रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाला किल्ला, लाल महल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी सारख्या ऐतिहासिक स्थळांना कव्हर करणार आहे. ही ट्रेन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट देणार आहे. तसेच यातील प्रमुख आकर्षणांमध्ये भीमाशंकर, ज्योतिर्लिंग आणि कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर यांचा समावेश आहे.

---------

### आसाममध्ये महापुरामुळे

एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे, यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. श्रीभूमी हा आसाममधील सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे.

--------

### राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाच्या

सर्व प्रकारचे निर्णय हे लोकशाही पद्धतीनेच होतील, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. हा फक्त माझाच निर्णय नाही. याबाबत पक्षातर्फे निर्णय घेतला जाईल. गेल्या सहा दशकांपासून महाराष्ट्राने शरद पवार यांच्या कामाची पद्धत पाहिलेली आहे. शरद पवार जो निर्णय घेतात किंवा जे मार्गदर्शन करतात ते लोकशाही पद्धतीनेच होते. त्यामुळेच पक्षाचा जो काही निर्णय असेल तो पक्षातील शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच घेतला जाईल. कोणताही निर्णय आम्ही आतापर्यंत एकाधिकारशाहीने घेतलेला नाही. यापुढेही कोणताही एकर्तफी निर्णय होणार नाही, असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांना प्रवक्ते अमोल मिटकरी यांच्या 'पांडुरंगाच्या इच्छेने एकत्र येऊ' या विधानामुळे गती मिळाली होती. पण हे विधान पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून फारसे पचनी न पडल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान सुनील तटकरे यांनी पुढे बोलताना म्हटले की, अमोल मिटकरींना सल्ला आहे की त्यांनी वक्तव्य जपून करावे. ते पक्षाचे प्रवक्ते आहेत, त्यामुळे पक्षाची भूमिका एकदा मांडल्यानंतर पुन्हा त्यावर बोलण्याची गरज नाही, असे तटकरे यांनी ठणकावून सांगितले.

-------------

### शिंगारवाडीत वीस वर्षीय

गेल्या दहा-बारा वर्षांपासून रामेश्वरचे वडील नारायण कोळेकर हे प्रदीर्घकाल आजारी असल्याने घर चालवण्याची जबाबदारी आई शांताबाई कोळेकर व रामेश्वर वर येऊन पडली होती. शनिवार दि.७ जून रोजी रामेश्वर हा तिंतरवणी येथील आठवडी बाजारातून जाऊन आला होता. तर आई एकादशीच्या निमित्ताने दुपारी श्री.क्षेत्र नारायण गडावर वारी निमित्त दर्शनासाठी गेल्या होत्या. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आई शांताबाई घरी आल्यानंतर घर उघडत नाही म्हणून आजूबाजूच्या लोकांना बोलावून घेतले व घरावरील पत्रे उचकून काढले असता घरामध्ये मुलगा रामेश्वर रामेश्वर याने घरातील आडुला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. सदरील घटनेची माहिती चकलांबा पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांच्या वतीने घटनेचा पंचनामा करून रामेश्वर कोळेकर यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकडे पाठवण्यात आला होता. रात्री उशीर झाल्यामुळे शवविच्छेदनासाठी नातेवाईकांना सकाळपर्यंत ताटकळत बसावे लागले. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास शेव विच्छेदन झाल्यानंतर रामेश्वर यांच्या मृतदेहावर शिंगारवाडी येथे दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. रामेश्वर कोळेकर हा शांताबाई नारायण कोळेकर या दांपत्यास तीन मुलीच्या पाठीवर एकुलता एक मुलगा होता व तो आजारी वडिलांची लक्षपूर्वक देखरेख करत होता. स्वभावाने ही तोच चांगलाआणि समजदार असल्याचे गावकरी सांगत आहे. रामेश्वर यांनी हा टोकाचा निर्णय का घेतला याबद्दल गावकऱ्यांनाही मोठा संभ्रम निर्माण आहे तर त्याच्या या अकाली निधनाचे सर्वत्र हळहळ ही व्यक्त केली जात आहे. रामेश्वरच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट नसून चकलांबा पोलिसांमध्ये याप्रकरणी अकस्मात नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार घनश्याम हे करत आहेत.

----------

### स्व.आर.टी. जिजा संयम

आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही खूप मोठी पोकळी आहे. यानिमित्त हभप यशवंत महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. त्यांनी 'कर्तव्यनिष्ठ जीवनाची प्रेरणा' या विषयावर भावस्पर्शी कीर्तन सादर केलं. कीर्तन श्रवण करताना पंकजाताईंच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ व देशमुख यांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### बच्चू कडू यांचे

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील संत गाडगेबाबा मंदिरापासून ते मोझरी येथील समाधीपर्यंत भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत राज्यभरातून तब्बल २० हजार शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनपूर्वी आमदार बच्चू कडू यांनी ठाम भूमिका मांडली. ते म्हणाले, आमची अंत्ययात्रा निघाली तरी चालेल, पण आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. मी शेतकऱ्यांची कर्जमाफी, दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर मच्छीमारांसाठी आंदोलन करत आहे. यासंदर्भात शासनाकडून आश्वासन मिळाली होती. परंतु त्याची पुर्तता झाली नाही. आता जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही. शेतमालांचे भाव पडलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव दिला पाहिजे. घरकुलाचा मुद्दा आहे. मच्छीमारांचा, मेंढपाळ यांचा मुद्दा आहे. अनेक वेळा पत्र देऊनही मागण्या मान्य झाल्या नाही. त्यामुळे अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

----------

### कोणताही निधी बेकायदेशीररित्या

दुसऱ्या कामाकरता एखादा निधी ठेवला असेल आणि तो तिसऱ्या कामावर खर्च केला जातो, तेव्हा आपण निधी वळवला असे म्हणतो. अर्थसंकल्पामध्ये जर कायद्यानेच तुम्हाला त्या विभागाकरता किंवा त्या घटकाकरता जो पैसा खर्च होतो तो त्या घटकाच्या मंत्रालयात दाखवावा लागत असेल तर ते दाखवणे चूक नाही. पैसा कुठेही वळवलेला नाही. त्या विभागातच तो पैसा दाखवणे हा अर्थसंकल्पाचा नियम आहे. त्याचप्रमाणे ते अर्थसंकल्पामध्ये दाखवलेले आहे आणि त्यातून तो खर्च केलेला आहे.

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ०९ जून २०२५



## ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय वडे यांची दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल पत्रकारांच्या वतीने सत्कार

**जामखेड। प्रतिनिधी**

**ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय वडे यांची दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल पत्रकारांच्या वतीने सत्कार जामखेड तालुक्यातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संचालक पदी ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय वडे यांची नियुक्ती झाल्यावर जामखेड तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने वडे यांचा सत्कार करण्यात आला.**

यावेळी दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव शशिकांत देशमुख, पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी मोहदीन तांबोळी, सामना तालुका प्रतिनिधी सुदाम वराट, रोखठोक न्यूजचे संपादक अविनाश बोधले, हॅलो अहिल्यानगरचे संपादक अशोक वीर, तुकाराम अंदुरे, दत्तात्रय पवार, जामखेड एक्सप्रेसचे पप्पूभाई सय्यद, किरण रेडे, पांडुरंग माने, साहिल भैय्या तांबोळी उपस्थित होते. गेल्या ७५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच या संस्थेची निवडणूक कोर्टाच्या आदेशानुसार गुरुवारी दि (५) जून पार पडली यामधे बहुमताने उध्दव देशमुख, शशिकांत देशमुख व अरुण चिंतामणी यांच्या नेतृत्वाखाली पॅनलने विजय संपादन केला. दत्तात्रय वडे या आधी ही संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले होते. वयाच्या ९१ व्या वर्षी ते पुन्हा संचालक पदी नियुक्ती झाल्याने जामखेड तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## घरकुलासाठी मोफत वाळू : केंद्र-राज्य सरकारच्या धोरणाने गरिबांना दिलासा - आ. बबनराव लोणीकर

जालना । प्रतिनिधी

सन्मानाने जगण्याचा हक्क आणि सुरक्षित निवारा ही मूलभूत गरज आहे. याच उद्दिष्टाने केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने अनेक योजनांच्या माध्यमातून क्रांतिकारी पावले उचलली आहेत, आणि मला अभिमान आहे की, मी आपल्या परतूर-मंठा मतदारसंघात या योजनांच्या अंमलबजावणीत सक्रिय सहभागी आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री परतुरचे आ बबनराव लोणीकर बोलताना म्हणाली.परतूर आणि मंठा तालुक्यातील विविध घरकुल योजनांअंतर्गत (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजना, पारधी आवास योजना, आणि आदिम आवास योजना) पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाच्या मोफत वाळू



धोरणानुसार प्रति घरकुल ५ ब्रास वाळू मिळण्यासाठी पास देण्याचा निर्णय परतूर आणि मंठा तहसील कार्यालयांमार्फत घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, दिनांक ७ जून २०२५ रोजी शनिवारी, परतूर विधानसभा आ. श्री लोणीकर यांच्या हस्ते परतूर आणि मंठा तहसील कार्यालयांमध्ये मंजूर घरकुल असलेल्या पात्र लाभार्थ्यांना हे वाळू पास वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित घरकुल मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की परतूर-मंठा मतदारसंघाचा आमदार म्हणून, मी प्रत्येक गावात, प्रत्येक वाडीवस्तीवर जाऊन लाभार्थ्यांशी संवाद साधला आहे. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि तहसील कार्यालयांमार्फत योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवला. मोफत वाळू पास वाटप हा त्याचाच एक भाग आहे. माझा संकल्प आहे की, आपल्या मतदारसंघातील एकही पात्र लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नाही. आदरणीय बंधू-भगिनींनो, केंद्र आणि राज्य सरकारच्या या योजनांमुळे लाखो गरिबांचे जीवन बदलले आहे. पक्के घर म्हणजे केवळ भिंती आणि छप्पर नाही, तर ते सन्मान, स्थैर्य आणि स्वप्नांचा पाया आहे. मी आपणा सर्वांना आवाहन करतो की, या योजनांचा लाभ घ्या, आपल्या गावातील पात्र व्यक्तींना याबाबत जागरूक करा आणि सरकारच्या या प्रयत्नांना आपले सहकार्य द्या. असे आमदार लोणीकर यांनी नमूद केले. या प्रसंगी परतूर येथे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते शत्रुघ्न कणसे, रमेश भापकर संपत टकले संभाजी वारे, कृष्णा आरगडे, पद्माकर कवडे, बंडू मानवतकर, सिताराम राठोड, निर्दास राठोड, विक्रम धुमाळ,भगवान आरडे, प्रकाश दीक्षित यांच्यासह उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, गटविकास अधिकारी तांगडे यांच्यासह भाजप कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

## भीमसिंह विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी भारत मगर

**बीड । प्रतिनिधी**

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत भीमसिंह विद्यालय, मातोरी, ता. शिरूर कासार या शाळेच्या मुख्याध्यापकपदी भारत मगर यांची निवड झाली आहे . मुख्याध्यापकपदी निवड होताच, भारत मगर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

सिरसमार्ग येथील समर्थ विद्यालयात कार्यरत असलेले विद्यार्थीप्रिय व ज्येष्ठ शिक्षक भारत मगर यांची मातोरी येथील भीमसिंह विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी निवड झाली आहे . काल त्यांनी पदभार स्विकारला. समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचीव सुभाषदादा पवळ यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. भारत मगर सर यांची मुख्याध्यापकपदी निवड होताच, सिरसमार्ग ग्रामस्थांनी



आनंदोत्सव साजरा केला . संस्थेचे सचिव सुभाषराव पवळ, भारतराव तांबारे, राजेंद्र केसभट, बाबुराव पठाडे, अशोक पवळ,गणेश तळेकर, बहीर, कळमकर, सर्जेराव तांबारे, जामकर, प्रकाश शिंदे, सचिन रडे, बांगर आदीसह ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी, मित्रपरिवार व कर्मचारीवृंद यांनी भारत मगर सर यांचे अभिनंदन करुन, पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोयाबीन बियाणे वाटपात शेतकऱ्यांची फसवणूक;

### जिल्हाधिकारी साहेबांनी लक्ष घालावे - संचालक धनंजय गुंदेकर

***बीड । प्रतिनिधी***

राज्य शासनामार्फत वीस गुंठे ते एक हेक्टर शेती असलेल्या शेतकऱ्यांसाठी महा डीबीटी द्वारे अनुदान तत्त्वावर बियाणे वाटप करण्याची योजना मंजूर करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे शंभर टक्के अनुदानावर प्राप्त होते. बीड तालुक्यातील हजारो शेतकरी या योजनेत पात्र ठरलेले आहेत.



या योजनेचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना सुधारित व दर्जेदार बियाणे मिळणे शेतकऱ्याचे उत्पन्नामध्ये वाढ होणे व शाश्वत शेतीला चालना मिळणे होय सदर बियाणे शेतकऱ्यांना पुरवण्याची जबाबदारी ही महाबीजची आहे. मात्र महाबीज कडूनच शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सोयाबीनच्या बॅगेला २५ किलो २२ किलो व ३० किलो पॅकिंगची मान्यता मिळालेली आहे. परंतु बीड जिल्ह्यामध्ये महाबीज द्वारा द्वारा फक्त २२ किलो ची बॅग शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. त्यामुळे शासनामार्फत ७५ किलो अनुदानास प्राप्त असल्यास शेतकऱ्यांना ६६ किलो बियाणे मिळत आहे. शेतकऱ्यांना नऊ किलो बियाणे व त्या बियाण्यावरील अनुदान कमी मिळत आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासनाने मंजूर केलेला या योजनेला महाबीज च्या चुकीमुळे व्यत्यय येत आहे व शेकडो शेतकऱ्यांना ०९ किलो बियाणे हे कमी मिळत आहे तरी शेतकऱ्यांची होत असलेले नुकसान पाहता महाबीजवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## ....म्हणून सरकारसोबत जातोय, अखेर चंद्रहार पाटील यांचा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र

सांगली । प्रतिनिधी

डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. चंद्रहार पाटील यांनी सोशल मीडिया पोस्ट करुन या निर्णयाची माहिती दिली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी चंद्रहार पाटील यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. चंद्रहार पाटील यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती, त्यामध्ये त्यांचा पराभव झाला होता. आता चंद्रहार पाटील यांनी सरकारसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बरोबर एक वर्षानं चंद्रहार पाटील यांनी



ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे.

चंद्रहार पाटील काय म्हणाले?

राज्यातील क्रीडा क्षेत्रामध्ये काम करत असताना, बऱ्याच त्रुटी, अडचणी, गैरप्रकार मी अनुभवलेले आहेत. अशा बाबींविरुद्ध मी वेळोवेळी आवाज देखील उठवला आहे. परंतु, प्रत्यक्ष शासन सहभागाशिवाय असे प्रश्न मार्गी लागणे कठीण आहे. म्हणून क्रीडा क्षेत्रामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करण्यासाठी, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी सरकार सोबत जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, असं चंद्रहार पाटील म्हणाले. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ४ जून २०२५ ला महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील सोमवारी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. हिंमत असेल तर थांबवा, असं चॅलेंज ठाकरेंच्या शिवसेनेला दिलं होतं. त्यावेळी चंद्रहार पाटील यांनी मी अजूनही ठाकरेंच्या शिवसेनेतच असून पक्ष सोडण्याबाबत अजून निर्णय घेतला नाही. शिंदेंच्या शिवसेनेकडून पक्ष प्रवेशाबाबत मला ऑफर आहे, असं म्हटलं होतं. आता चंद्रहार पाटील यांचा निर्णय झाला आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून चंद्रहार पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून चंद्रहार पाटील यांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. खासदार श्रीकांत शिंदे यांनी एप्रिल महिन्यात चंद्रहार पाटील यांच्यासंदर्भात एक वक्तव्य केलं होतं. ते म्हणाले होते डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील हे चांगले कार्यकर्ते आहेत. ते जर आमच्या शिवसेनेत येणार असतील तर त्यांचे स्वागत आहे. त्यांच्यासाठी आमच्या शिवसेना पक्षाची दारे ही कायम उघडी आहेत.

## 'वामा लढाई सन्मानाची' चित्रपटास पत्रकारांचा उत्तम प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

तेलुगु हिंदी, अवधी, भोजपुरी अशा इतर चार भाषांमधील नऊ हिट चित्रपटांनंतर आपल्या भूमिपुत्राच्या मराठी सिनेसृष्टीतील पहिलाच मराठी चित्रपट वामा लढाई सन्मानाची संपूर्ण महाराष्ट्रात मागील ३ आठवड्यांपासून हाऊसफुल सुरू आहे. बीडकरांनी देखील आपल्या भूमिपुत्राच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. दिनांक ८जून २०२५ रोजी बीड मधील समस्त पत्रकार बांधवांसाठी वामा लढाई सन्मानाची स्पेशल शो चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रपटास पत्रकारांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

जगात पदोपदी आढळणारा पुरुषी अहंकार व स्त्रिला त्यामुळे होणारा त्रास हा परंपरा म्हणून सर्वांनी स्विकारला आहे. आधुनिक म्हणवणाऱ्या काळातही तेच चालु आहे. पण स्त्रि-सशक्तीकरण झाल्यामुळे यात काय फरक पडु शकतो हे या चित्रपटात सरला या नायिकेची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री कश्मीरा कुलकर्णी यांनी या भूमिकेत स्वतःला अक्षरशा झोकून देत ती सादर केली आहे. पडद्यावर ही भूमिका साकारताना त्या जेवढ्या साध्या सरळ आणि सोज्वळ वाटल्या तेवढ्याच



कणखर प्रसंगात अत्यंत आक्रमक आणि जोशाने भरपूर दिसल्या .त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, संवादाची सादरीकरण ,शारीरिक भाषा अत्यंत उत्कृष्टरित्या त्यांनी सादर केली आहे. त्यांना पडद्यावर पाहताना चित्रपट रसिकांना वाटते की आपली आई बहीण पत्नी मुलगी अशीच कर्तबगार पाहिजे एवढी त्यांची भूमिका दर्शकाच्या मनावर परिणाम करते एवढेच काय मराठी चित्रपटातील अभिनेत्री सुद्धा हाणामारीच्या प्रसंगात कमी नाहीत हॉलीवुड च्या नायीके प्रमाणे त्यांनी पतीच्या भूमिकेत असलेल्या नायकला दाखविलीआहे. कथानकाची लांबी फार नाही पण चित्रपट पुढे काय होते या उत्सुकतेपोटी प्रेक्षकाला खिळवून ठेवतो. कश्मिरा कुलकर्णीने भूमिका जोरदार वठविली आहे व स्त्रीचे वेगळेच रुप या चित्रपटात दिसते. जुई बेंडखळे यांनी त्यांच्या भूमिकेस न्याय दिला आहे. यात दोन शृंगारिक नृत्यही आहेत.(गौतमी पाटील आणि स्नेहा गुप्ता) यातील नायकाची भूमिका डॉ.महेशकुमार यांनी वठविली आहे व रुढ नायकापेक्षा वेगळ्या धाटणीचा नायक त्यांनी अप्रतिम साकार केला आहे. असे अहंकारी पुरुष ( या चित्रपटातील नायक) आपल्याला जगात पदोपदी आढळतात व महेशकुमार यांनी तो सहजतेने (जी गोष्ट अवघड असते) साकारला आहे. शेवटी छोटे खानी कार्यक्रमात डॉ. महेश कुमार वनवे यांनी उपस्थित सर्व पत्रकारांचे मनापासून आभार मानले व महिला सशक्तीकरणावर आधारित वामा लढाई सन्मानाची चित्रपट असल्यामुळे चित्रपट गृहामध्ये सकाळच्या नऊच्या शोला येणाऱ्या पहिल्या १० महिलांसाठी हा चित्रपट दररोज विनामूल्य असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.पत्रकार वैभव स्वामी. एस एम युसुफ,आत्माराम वाव्हळ, डॉ. संजय तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भागवत वैद्य ,अभिजीत नखाते, शिवप्रसाद सिरसाट, रईस खान, राजू वंजारे , आदी सह पत्रकार व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## पुण्यभूमी श्रीक्षेत्र चाकरवाडीत स्वर्ग अवतरला - महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

**सारणी । दिनकर जाधव**

**संत ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या पुण्यतिथी उत्सवात पुण्यभूमी श्रीक्षेत्र चाकरवाडी (जि.बीड) येथे स्वर्ग अवतरला आहे असे प्रतिपादन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण भाऊ महाराज उत्तरेश्वर पिंपरी, श्री ह भ प राम महाराज काजळे, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे, जिल्हा दुध संघाचे चेअरमन तानाजी कदम यांच्यासह हजारो भावी भक्तांचे उपस्थिती होती.**



पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प संपन्न

बीडच्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती संत ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी समर्पित केले. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।तेथें माझी हरी वृत्ति राहो ।।१।।

आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ।।ध्रु.।।

ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चिंत झणी जडों देसी ।।२।।

तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ।।३।।

या अभंगावर चिंतन मांडले पुढे बोलताना महाराज म्हणाले. रौप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात इंद्राला लाजवेल अशी व्यवस्था केली. स्वर्ग आम्ही पाहिलेला नाही. मात्र आज श्रीक्षेत्र चाकरवाडीत साक्षात स्वर्ग अवतरला आहे. या ज्ञानगंगा मध्ये नाहून निघण्याच्या संताच्या आशीर्वादातून परम भाग्य मिळाले.

हा अभंग सूत्रात्मक आहे. सूत्र छोटे असते मात्र यामध्ये खूप मोठा गहन अर्थ दडलेला असतो..वेदाची महावाक्य छोटी आहे. त्यात आध्यात्मिक हित दडलेले आहे.माणसाच्या आदर्श जीवनाची सूत्र संत साहित्यात आहे. काहीवेळा काम शिल्लक राहते आयुष्य संपते, तर काहीवेळा काम संपून जाते आयुष्य शिल्लक राहते. संत नामदेव महाराज यांनी अभंग रचनेची प्रार्थना केली. पण आयुष्य संपले. म्हणून पुन्हा जगतगुरु तुका अवतार नामयाचा. तुकाराम महाराज पुन्हा अभंग रचना करताना पहिला अभंगहा लिहिला या अभंगात मंगल केलेले. मंगलाचे विविध प्रकार आहेत यामध्ये आशीर्वादात्मक वस्तू निर्देशनात्मक आणि नमस्कारात्मक या अभंगात वस्तू निर्देशनात्मक आणि आशीर्वादात्मक मंगल आहे..वारकरी संप्रदायाने जातीयता निर्मूलन करण्याचे काम जोग महाराज यांनी केले.माऊली दादाच्या चरणी प्रार्थना हा जातीवाद संपवा पुन्हा सामाजिक घडी बसावी ही मागणी. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केली.

विठेवरील पांडुरंगाची दृष्टी सम आहे.संतांची दृष्टी सम असते.आता दया ते येसी पूर्ण चंद्रिका जैसी अस साजरे आणि सुन्दर चरण विठेवर आहे. भोगाच्या अनुकूलते मध्ये समाधान नाही तर वृत्तीच्या स्थिरतेवर समाधान अवलंबून आहे.वृत्ती देवाच्या नाम स्मरणाने स्थिर होते.जगाच्या पाठीवर देवा व्यतिरिक्त सर्व मायिक पदार्थ आहेत. त्याचे वर्म आम्हाला कळले आहे असे महाराजानी चिंतन मांडले.

यावेळी साथ संगत माऊली महाराज आवटे, संजय महाराज देवकर, बिबीशन महाराज कोकाटे, मुरकुटे महाराज, हरिभाऊ महाराज काळे , सतीश महाराज जाधव, आदित्य महाराज पवार यांच्यासह शेकडो टाळकरी मंडळी गुणीजन मंडळी उपस्थित होती.

## पान ६ वरून...

### औंढा नागनाथ येथून

जेव्हा दुसऱ्या कामाकरता एखादा निधी ठेवला असेल आणि तो तिसऱ्या कामावर खर्च केला जातो, तेव्हा आपण निधी वळवला असं म्हणतो. अर्थसंकल्पामध्ये जर कायद्यानेच तुम्हाला त्या विभागाकरता किंवा त्या घटकाकरता जो पैसा खर्च होतो तो त्या घटकाच्या मंत्रालयात दाखवावा लागत असेल तर ते दाखवणे चूक नाही. पैसा कुठेही वळवलेला नाही. त्या विभागातच तो पैसा दाखवणे हा अर्थसंकल्पाचा नियम आहे. त्याचप्रमाणे ते अर्थसंकल्पामध्ये दाखवलेले आहे आणि त्यातून तो खर्च केलेला आहे, असंही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### स्वच्छ भारत, उज्ज्वला, जनधन

संरक्षण, उत्पादन आणि कृषी-प्रक्रिया क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन मिळाले. परकीय गुंतवणूक धोरणे उदार केली गेली, विशेषत संरक्षण आणि रेल्वे क्षेत्रात आर्थिक वाढ झाली. २०१४ मध्ये भारत जगातील १० वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होती, जी २०२३ पर्यंत ५ व्या क्रमांकावर पोहोचली. जीडीपी वाढीचा दर २०१४-२२ मध्ये सरासरी ७.६% होता, जो यूपीए सरकारच्या ६.७% पेक्षा जास्त आहे. असे आमदार लोणकर यांनी यावेळी नमूद केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे, भाजपा जालना शहर अध्यक्ष भास्कर आबा दानवे पाटील, सुनील बापू आर्दड, सोपान पेंढारकर, धनु शेठ काबलीये, श्रीमती आगलावेताई, श्रीमती संध्याताई देठे,यांची उपस्थिती होती

cmyk

# जमिनीच्या प्रतवारीनुसार ठरवा लागवडीसाठी सोयाबीन वाण !

## लागवडी अगोदर जाणून घ्या कृषी तज्ज्ञांचा सल्ला

खरीपात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक म्हणजे सोयाबीन. बहुतेक शेतकरी सोयाबीन लागवड करण्याच्या तयारीत असतील आणि त्यासाठी वेगवेगळ्या वाणांचे सोयाबीन बियाणे विकत घेत असतील. त्यांनी जमिनीनुसार सोयाबीन वाण ठरवून त्याची लागवड केली पाहिजे. यासाठी कृषी तज्ज्ञांचा सल्लाही लक्षात घेतला पाहिजे.

जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या वाणाची निवड : कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी बांधवांनी त्यांच्या जमिनीच्या मगदूरानुसार सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे.

हलकी जमीन - हलकी जमीन असेल तर ८५ ते ९५ दिवसात कापणीसाठी तयार होणाऱ्या सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे. या जमिनीत लागवडीसाठी जे.एस.-९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस. -१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु. एस-१५८, एम. ए.यु.एस.-६१२, जे.एस. -३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करावी. मध्यम जमीन - अशा जमिनीत शेतकऱ्यांनी ९५ ते १०० दिवसात हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड केली पाहिजे.




हलकी ते मध्यम जमीन - अशी जमीन असल्यास जे.एस.- ९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस.-१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु.एस-१५८, एम. ए.यु.एस.- ६१२, जे.एस. ३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करायला काही हरकत नाही.

भारी जमीन - अशा जमिनीत मध्यम ते उशिरा येणारे वाण निवडावे. भारी जमीन असेल आणि शाश्वत पाण्याची उपलब्धता असेल तेव्हाच उशिरा येणाऱ्या वाणाची निवड करावी. जर भारी जमीन असेल आणि पाण्याची सोय नसेल तर मध्यम कालावधीत हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. भारी जमिनीसाठी शेतकरी बांधव फुले किमया, फुले संगम, फुले दुर्वा, एम. ए.यु.एस-७१, एम. ए.यु.एस- ६१२, फुले कल्याणी, तसेच पी.के.व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस - १००३९) या सोयाबीन जातींची निवड करू शकतात.

सोयाबीन वाण लागवडीसंबंधी महत्त्वाची सूचना :शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्वच क्षेत्रावर फक्त एका प्रकारचे वाण लावणे टाळावे. म्हणजेच पाच एकर क्षेत्र असेल तर त्यापैकी काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची आणि काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची लागवड करावी. जेणेकरून शेतकर्यांना एका जातीपासून चांगले उत्पादन मिळाले नाही तर दुसर्या जातीपासून चांगले उत्पादन मिळेल. यामुळे शेतकर्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. तुम्ही तुमच्या जमिनीच्या मगदूराप्रमाणे तुमच्या क्षेत्रात दोन-तीन प्रकारच्या जातींची लागवड केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळू शकणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२४ : पेरू येथे भूकंप.
१६५८ : मुघल शासक औरंगजेब यांनी आग्र्याचा किल्ला काबीज केला
१६७० : पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला शिवाजी महाराजांनी परत जिंकून घेतला.
१७०७ : औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम आणि आझमशाह या त्याच्या दोन मुलांमधे दिल्लीच्या तख्तासाठी युद्ध झाले. यात मुअज्जमने आझमशाहला ठार करुन दिल्लीची गादी बळकावली.
१७१३ : मुघलांनी १६८९ मधे जिंकलेला रायगड किल्ला पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीकडुन राजकारणाने जिंकुन घेतला.
१७८३ : आईसलँड मधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक, हजार ठार.
१९१२ : कार्ल लेम्ले यांनी यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीची स्थापना केली.
१९१५ : टिळकांनी मंडाले तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून पुर्ण केला.
१९१५ : लो. टिळक यांचे मंडालेच्या तुरुंगातून सुटका.
१९१८ : नोव्हा ॲक्विला या सर्वाधिक तेजस्वी तेजोमेघाचा शोध.
१९४१ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी सीरीया व लेबानॉन पादाक्रांत केले.
१९४८ : भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान एअर-इंडियाची हवाई सेवा सुरु.
१९४८ : जॉर्ज ऑर्वेलची १९८४ या नावाची कांदबरी प्रसिद्ध झाली.
१९५३ : कृष्णवर्णीयांना हॉटेलमधे सेवा नाकारण्यास अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली.
१९६८ : बर्मोडा देशाने संविधान अंगिकारले.
१९६९ : लष्करप्रमुख म्हणून सॅम माणेकशा यांची नियुक्ती.
१९९२ : पहिल्यांदा जागतिक महासागर दिन साजरा केला गेला.
२००४ : आधुनिक काळातील शुक्राचे (सूर्यावरुन) पहिले अधिक्रमण झाले. याआधीचे अधिक्रमण १८८२ या वर्षी झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०६ : भारतीय क्रिकेट खेळाडू सैयद नझीर अली यांचा जन्म.
१९१० : दिनकर केशव बेडेकर, तत्त्वचिंतक, समीक्षक, लेखक (मृत्यू: २ मे १९७३)
१९१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट २०१५)
१९१७ : गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकार. (मृत्यू: २ एप्रिल २००९)
१९२१ : इंडोनेशिया देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष सुहार्तो यांचा जन्मदिन.
१९२५ : बार्बरा बुश, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुशची पत्नी व जॉर्ज डब्ल्यु. बुशची आई.
१९३२ : सैयद नझीर अली, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भैतिकशास्त्रज्ञ केनिथ गेडीज विल्सन यांचा जन्म.
१९५५ : वर्ल्ड वाईड वेब चे जनक टिम बर्नर्स-ली यांचा जन्म.
१९५७ : चित्रपट अभिनेत्री डिंपल कपाडिया यांचा जन्म.
१९७५ : शिल्पा शेट्टी, भारतीय अभिनेत्री आणि निर्माता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३२ : इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांचे निधन.
१७९५ : फ्रान्सचा राजा लुई १७ वा यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १७८५)
१८०९ : अमेरिकन विचारवंत राजकारणी थॉमस पेन यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १७३७)
१८४५ : अमेरिकेचे वे७ राष्ट्राध्यक्ष ॲन्ड्रयू जॅक्सन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १७६७)
१९९५ : रंगभूमी कलावंत एकपात्री प्रयोगकार राम नगरकर यांचे निधन.
१९९८ : नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष सानी अबाचा यांचे निधन.
२००९ : लोकप्रिय भारतीय उर्दू-हिंदी नाटककार, चित्रपट दिग्दर्शक, कवी आणि अभिनेता हबीब तनवीर यांचे निधन.

# उन्हाळी मिरची बाजारात दाखल; जाणून घ्या तेजा फोर हिरवी मिरचीचा भाव!



सध्या बाजारात उन्हाळी मिरचीची आवक सुरू झालेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात पाणीटंचाई असताना देखील शेतकऱ्यांनी यावर्षी उन्हाळी मिरचीची मोठ्या प्रमाणावर लागवड केलेली होती. आता ही मिरची बाजारात येऊ लागली असून, आमठाणा बाजारात मिरची खरेदीला गुरूवारी सुरुवात झाली. यामध्ये 'तेजा ४' मिरचीला सर्वाधिक साडेदहा हजार रुपये प्रति क्विंटलचा भाव मिळाल्याने उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सिल्लोड तालुक्यातील आमठाणा, देऊळगाव बाजार, घाटनांद्रा, धावडा, केळगाव, कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी, करंजखेडा या भागात एप्रिल महिन्यात उन्हाळी मिरचीची यंदा सर्वाधिक लागवड झालेली आहे. आता ही मिरची बाजारात येण्यास सुरुवात झाली आहे. परिसरात आमठाणा येथे मिरचीची मोठी बाजारपेठ असून येथून आखाती देशात 'तेजा फोर' मिरची पाठविली जाते. गुरूवारी या मिरची मार्केटला सुरुवात झाली. यानंतर मिरची खरेदी सुरू करण्यात आली. यात 'तेजा फोर' वाणाच्या मिरचीला सर्वाधिक १० हजार ५०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला.

शेतकरी समाधानी

आमठाणा येथील बाजारात मिरचीला मागील वर्षी प्रति क्विंटल ११ हजार रुपये भाव मिळाला होता. या वर्षीही १० हजार ५०० रूपयांचा दर पहिल्याच दिवशी मिळाल्याने शेतकर्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. आणखी भाव वाढावा किंवा आहे, तोच टिकून राहावा, अशी उत्पादक शेतकर्यांची इच्छा आहे.

# वॅक्सिंगसाठी कृत्रिम मेणाचे प्रकार

विविध प्रकारच्या रासायनिक प्रक्रियेद्वारे कृत्रिम मेण तयार केले जाते. कृत्रिम मेण प्रामुख्याने पेट्रोलियम, कोळसा किंवा वनस्पती तेलांपासून संश्लेषित केले जाते. त्याचे गुणधर्म हे बऱ्याच अंशी नैसर्गिक मेणासारखे असून, त्यांचा वापर औद्योगिक क्षेत्रासह अन्न संरक्षणात केला जातो. फळे आणि भाज्यांचे संरक्षणासाठीही कृत्रिम मेणाचा वापर करता येतो. मात्र काही कृत्रिम मेण हे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे त्यांचा अतिरेक टाळला पाहिजे.

फायदे :नैसर्गिक मेणाच्या तुलनेत अधिक टिकाऊ. उच्च तापमान व वातावरणीय परिस्थितींमध्ये अधिक प्रतिरोधक. कृत्रिम मेणचे उत्पादन वैज्ञानिक पद्धतीने आणि एकसंध प्रक्रियेद्वारे करतात. त्याची गुणवत्ता नियंत्रित करता येते. नैसर्गिक मेणाच्या तुलनेत स्वस्त.

तोटे :काही कृत्रिम मेणामधील पेट्रोलियम आधारित घटक मानवी आरोग्यास हानिकारक ठरू शकतात. विशिष्ट प्रकारचे कृत्रिम मेण पचनास कठीण असून पचनासंबंधी समस्या उद्भवू शकतात. कृत्रिम मेण निर्मितीमध्ये वापरले जाणारे रासायनिक पदार्थ (उद. पॅराफिन) विषारी ठरू शकतात. पर्यावरणपूरक आणि जैव-विघटनक्षमतेचा अभाव. मूळ पदार्थांच्या चव आणि गंधावर परिणाम होऊ शकतो.



पॅराफिन मेण :पॅराफिन मेण हे गंधहीन, रंगहीन आणि चवहीन मेण आहे. मुख्यतः पेट्रोलियमपासून मिळवल्या जाणाऱ्या या मेणाचा वापर अन्न प्रक्रिया, सौंदर्यप्रसाधने, औषधनिर्मिती, मेणबत्त्या, क्रेयॉन्स आणि इलेक्ट्रिकल इन्सुलेशन यासाठी औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये केला जातो. अन्न उद्योगात पॅराफिन मेण फळे आणि भाज्यांना संरक्षण देणे, त्यांना चमकदार आणि टिकाऊ बनवणे या उद्देशाने वापरतात.

मायक्रोक्रिस्टलाइन मेण :मायक्रोक्रिस्टलाइन मेण हे पेट्रोलियम तेलमिश्रित मेण आहे. मऊ, चिकट आणि लवचिकतेसोबतच पॅराफिन मेणपेक्षा कठोर आणि अधिक पारदर्शक असतो. हे मेण पाण्यात विरघळत नाही. जलरोधक गुणधर्म, उच्च वितळण्याच्या तापमानामुळे आणि चांगल्या बाइंडिंग क्षमतेमुळे मायक्रोक्रिस्टलाइन मेण हा पॅराफिन मेणाच्या तुलनेत अधिक प्रभावी आणि बहुपयोगी मानले जाते.

पॉलिइथिलीन मेण :हे पॉलिइथिलीनच्या पॉलीमरायझेशन प्रक्रियेतून तयार केले जाणारे मेण आहे. ते अत्यंत टिकाऊ, जलरोधक आणि गुळगुळीत पोताचे असते. उच्च वितळणारे तापमान, उत्कृष्ट स्नेहन () आणि जलरोधक गुणधर्मांमुळे विविध औद्योगिक आणि व्यावसायिक उत्पादनांमध्ये वापरले जाते. पाण्यात विरघळत नसल्याने फळे, भाज्यांवर चमकदार आवरण तयार करते.

सिलिकॉन मेण : हे मेण सिलिकॉन - पॉलीमरपासून तयार केले जाते. उत्कृष्ट जलरोधक, उष्णता प्रतिरोधक, आणि स्नेहनक्षम () गुणधर्मांमुळे सौंदर्यप्रसाधने, ऑटोमोटिव्ह कोटिंग, खाद्य संरक्षण, औद्योगिक ल्युब्रिकंट्स आणि अन्य विविध क्षेत्रांत वापर केला जातो. अन्न प्रक्रिया उद्योगातही फळे आणि भाज्यांवरील कोटिंगसाठी सिलिकॉन मेण वापरले जाते. ते जैवविघटनशील असून,सुरक्षितही असते.

# खरीप हंगामातील चारा व गवत पिकांचे लागवड तंत्रज्ञान

पश्चिम महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला मिळणाऱ्या संतुलित आहारावर अवलंबुन असते. शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते.

पशु आहारात दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व :१) जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. २) हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्वाचे घटक नैसर्गिक स्वरूपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. ३) जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देवुन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. ४) दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. ५) आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.

मका : मका हे जलद वाढणारे, पालेदार, सकस, रुचकर, अधिक उत्पादनक्षम, पौष्टिक तसेच भरपूर शर्करायुक्त पदार्थ असणारे चारा पीक आहे. मक्याच्या चाऱ्यापासून उत्तम दर्जाचा मुरघासही तयार करता येतो. हिरव्या चाऱ्यात ९ ते ११ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते.



ज्वारी : हे महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय असे महत्त्वाचे पारंपारिक चारा पिक आहे. अवर्षणप्रवण भागात व हलक्या जमिनीत देखील तग धरून राहण्याची क्षमता असल्याने निश्चित चारा उत्पादन देणारे पिक म्हणून या पिकाकडे पाहिले जाते. ज्वारीचा कडबा देखील जनावरांना चारा म्हणून देता येतो. ज्वारीचे चाऱ्याकरिता विकसित केलेले वाण सुमारे ३ ते ४ मीटर उंच वाढतात. त्याची ताटे हिरवीगार, पालेदार, रसाळ, रुचकर व पौष्टिक असल्यामुळे जनावरे ती आवडीने खातात. ज्वारीच्या चाऱ्यात ८ ते १० टक्के प्रथिने असतात.बाजरी : बाजरी हे हलक्या ते मध्यम जमिनीत घेतले जाणारे तृणधान्य वर्गातील चारा पिक असून महात्मा फुले कृषि विद्यापीठाने जायंट बाजरा या वाणाची चाऱ्यासाठी शिफारस केलेली आहे. या वाणाचा वाढीचा कल उंच असून लुसलुशीत हिरव्या चाऱ्यात प्रथिनांचे प्रमाणे ७ ते ९ टक्के असते. खरीप हंगामात जून-जुलै महिन्यात पेरणी करावी. पेरणीसाठी ३० सेंमी अंतरावर प्रति दहा किलो बियाणे पाभरीने पेरावे.

चवळी : मध्यम ते भारी चांगल्या निचऱ्याच्या जमिनीत चवळी या व्दिदल वर्गीय चारा पिकाची पेरणी पावसाळ्या जून ते ऑगस्ट या कालावधीत करावी. पेरणीसाठी श्वेता, इ.सी.४२१६, बुंदेल लोबिया, यु.पी.सी.५२८६, या वाणांची ३० सेंमी अंतरावर पाभरीने पेरणी करावी. पेरणीसाठी ४० किलो प्रती हेक्टरी बियाणे वापरावे. संकरीत नेपिअर : बाजरी व नेपिअर यांच्या संकरातुन फुले जयवंत व फुले गुणवंत हे दोन वाण महात्मा फुले कृषि विद्यापीठाने बहुवार्षिक चाऱ्यासाठी प्रसारीत केले आहेत. पालेदार, मऊ, रसाळ व ऑक्झालीक ॲसीडचे प्रमाणे अत्यल्प असल्याने जनावरांना कोणताही अपाय होत नाही. एकदा लागवड केल्यावर दर ४० ते ५० दिवसांच्या अंतराने हिरव्या चाऱ्याची सलग ३ ते ४ वर्ष कापणी करता येते. यामध्ये ९ ते १० टक्के प्रथिनांचे प्रमाणे असते.बागायती मारवेल : बागायत भागात हिरव्या चाऱ्यासाठी भरपुर फुटवे गोड, (ब्रिक्स ७.५०), रुचकर, जास्त पचनियता (६१.३० टक्के) असलेला 'फुले गोवर्धन' हा मारवे गवताचा बहुवार्षिक वाण मध्यम ते भारी, कसदार व उत्तम निचऱ्याच्या जमिनीसाठी विद्यापीठाने लागवडीसाठी शिफारस केली आहे. ४५३० सेंमी अंतरावर प्रत्येक ठिकाणी दोन डोळयांची एक कांडी याप्रमाणे हेक्टरी ७५ हजार कांड्यांची लागवड पावसाळ्यात जून ते ऑगस्ट या कालावधीमध्ये करावी.स्टायलो : स्टायलो हे व्दिदल बहुवार्षिक चारा पिक असुन जिरायत भागात हलक्या ते मध्यम जमिनीत ''फुले क्रांती'' या वाणाची पेरणी जून ते जुलै महिन्यात करावी. हे पीक आवर्षणप्रर्वण भागात मुरमाड व अतिशय हलक्या तसेच डोंगर उतारावरील जमीनीतही तग धरुन राहते. फळबागामध्ये अंतरपिक म्हणुन सुध्दा फायदेशीर ठरते तसेच जमिनीची धुप होवू नये म्हणुन शेततळ्याच्या भरावावर लागवड करता येते. या गवतात प्रथिनांचे प्रमाणे १२ ते १४ टक्के आढळते. एका वर्षात दोन कापण्याद्वारे प्रति हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल हिरव्या चाऱ्याचे उत्पन्न मिळते.

# असा करा जिवाणूसंवर्धनाचा वापर

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी जिवाणूसंवर्धनाचा वापर केला जातो. जिवाणू संवर्धने जमिनीत आढळणाऱ्या उपयुक्त जीवाणू पासून तयार केलेली असतात. जिवाणू संवर्धन स्वस्त किमतीत उपलब्ध होत असल्याने सर्वच शेतकऱ्यांना परवडण्यासारखी आहेत. पण काही वेळा जिवाणू संवर्धनाचा अपेक्षित परिणाम मिळत नाही.

रासायनिक खतांचा वाढलेल्या किंमती, बाजारपेठेत होत असलेली त्यांची कमतरता लक्षात घेता अपेक्षित उत्पादन वाढवण्यासाठी जीवाणू संवर्धनाचा वापर करणं फायद्याचं आहे. जीवाणू संवर्धनापैकी ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पीरिलियम, निळे - हिरवे शेवाळ आणि ॲझोला पिकाला नत्र पुरवतात. बॅसिलस मेगॅटेरियम जिवाणू स्फुरदाची उपलब्धता वाढवितात. तर मायकोरायझा सारखे जिवाणू पिकाला स्फुरद, पालाश, नत्र, कॅल्शियम, सोडियम, जस्त, तांबे यासारखे अन्नद्रव्य जमिनीतून शोषण करण्यास मदत करतात. यापैकी अझोटोबॅक्टर आणि रायझोबियम ही संवर्धने प्रचलित झाली आहेत आणि इतर जिवाणू संवर्धकाचा जास्त प्रमाणात वापर होत नाही. काही वेळेस मातीमध्ये अगोदरच असलेल्या इतर जिवाणूमुळे जिवाणू खताचा पिकावर अपेक्षित परिणाम



दिसून येत नाही. यामध्ये जमिनीत इतर अन्नद्रव्याची कमतरता असणं, जमिनीत उपलब्ध नत्र खताचा साठा जास्त असणं याशिवाय वापरलेले जिवाणू खत निकृष्ट दर्जाचे असल्यासही जिवाणू संवर्धनाचा अपेक्षित परिणाम मिळत नाही. शिफारशीपेक्षा जिवाणू खताचा वापर कमी केल्यास, बियांमध्ये विषारी पदार्थ असल्यामुळे, जिवाणू खतात इतर जिवाणूंची भेसळ असल्यास जिवाणू संवर्धनाचा चांगला पिरणाम होत नाही. तसच जमिनीचा अयोग्य सामू, जमिनीचे जास्त तापमान, जमिनीतील अपुरा ओलावा या बाबीही जिवाणू संवर्धानाचा परिणाम कमी होण्यास कारणीभूत ठरतात. जमिनीतील सेंद्रिय कर्ब आणि सेंद्रिय पदार्थांच्या कमतरतेमुळेही जिवाणू खतांचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत. त्यामुळे जिवाणू संवर्धानाचा वापर करताना वरिल गोष्टी तपासाव्यात त्यामुळे जिवाणूसंवर्धनाचा अपेक्षित परिणाम होऊन उत्पादनात वाढ करणे शक्य होईल.

# विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्काराची जपवणूक करावी -उपजिल्हाधिकारी विधाते

जालना। प्रतिनिधी

शिवसेना ही सामाजिक कार्य करणारी संघटना आहे. मागील पंचवीस वर्षापासून शिवसेनेने हा वसा जोपासला आहे. याच उद्देशाने आपल्या भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व भविष्याची दिशा निश्चित व्हावी यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता असे बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यावेळी बोलताना ते म्हणाले . दहावी व बारावीतील गुणांच्या आधारे मिळविलेल्या यशाने हुरळून न जाता पुढील शैक्षणिक ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्काराची जपवणूक करावी. असे आवाहन परभणीचे निवासी उपजिल्हाधिकारी व मंठ्याचे भूमिपुत्र जनार्धन विधाते यांनी केले. मंठा येथील गणेश लॉन्स मध्ये आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर बाजार समितीचे सभापती व कार्यक्रमाचे आयोजक ए जे बोराडे, अंकुशसर इन्स्टिट्यूटचे श्री अंकुशसर, शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, माजी पंचायत




समिती सदस्य किसनराव मोरे, रेणुका विद्यामंदिरचे उपमुख्याध्यापक आर के राठोड, छत्रपती संभाजीराजे महाविद्यालयाचे अध्यक्ष संजय चव्हाण, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष बी जे काळे, बाजार समितीचे संचालक डॉ. दत्तात्रय काकडे, बाबाराव राठोड, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय राठोड यांची उपस्थिती होती.

मंठा तालुक्यातील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना जनार्धन विधाते म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी व पालकांनी भविष्याची दिशा निश्चित करून निवडलेल्या क्षेत्रात मेहनतीने यश मिळवावे. यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासनाच्या निर्देशानुसार यावर्षी कॉपीमुक्त अभियान राबविले. विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश त्यांच्या परिश्रमाचे फळ असून केवळ शिकून शिक्षित होणे गरजेचे नाही तर संस्कारीत होऊन समाजाचे ऋण फेडणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांनी, भविष्यात विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी यासाठी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. मागील पंचवीस वर्षापासून शिवसेनेच्या माध्यमातून सामाजिक कार्याचा वसा जोपासत असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमात आयकॉन पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. प्रवीण सानप यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मुंबई येथील जे जे मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस ही पदवी विशेष प्राविण्यसह मिळवल्याबद्दल डॉ. प्रतीक्षा भगवान वाघ हिचा सत्कार झाला. कु. मैथिली पोरडवार या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला संतोष वरकड, योगेश अवचार, गणेशराव शहाणे, योगेश गणगे, कयूमभाई कुरेशी, शबाब कुरेशी, मधुकर काकडे, डॉ. संतोष पवार, रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, पांडुरंग बोराडे, विनोद खरात यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रदीप देशमुख तर आभार पप्पू दायमा यांनी मानले.

# पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा मोडकळीस

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील यंदा पहिलीच्या वर्गात प्रवेश घेत ८०० विद्यार्थी आपल्या प्राथमिक शिक्षणाचा श्री गणेशा करणार आहेत सोमवार दिनांक १६ जून पासून शाळेला सुरुवात होत असून यावर्षी शिक्षण विभागाने सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत स्पष्ट पुस्तकाचे विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी वाटप करण्याचे नियोजन केले आहे त्यासाठी ११९०० विद्यार्थ्यांसाठी ७९ हजार पाठ्यपुस्तक उपलब्ध करून देणार आहे दरम्यान यंदा शैक्षणिक कार्य संदर्भात सतर्कता दाखवणाऱ्या शिक्षण विभाग जिल्हा परिषद प्रशासनाने पाटोदा तालुक्यातील मोडकळीस आलेल्या शाळांच्या दृष्टीकडे मात्र दुर्लक्ष केल्याचे पालकांमधून खंत व्यक्त होत आहे शिक्षणाचे प्रमाण वाढावे शहरी भागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासनामार्फत विविध प्रकारच्या शैक्षणिक योजना राबवल्या जातात शालेय गणवेशाचे मोफत वाटप मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप या योजना शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या आहेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत



पाठ्यपुस्तके दिले जाणार आहे त्यानुसार शिक्षण विभागाने पूर्व नियोजन केले असून सर्व शाळांना पुस्तकाचे वाटप करण्याचे काम युद्धपातळी सुरू आहे त्याचप्रमाणे गणेश आणि शॉक साठी ८० टक्के निधी उपलब्ध झाला असून त्याचे वाटप होणार आहे परंतु सॉक्स विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी उशीर होणार आहे दरम्यान अंगणवाडीमध्ये बाल ताई ची गीते गोष्टी ऐकून शिक्षणाचे बालसंस्कार मिळवणारे तालुक्यातील ८०० बालक आता प्राथमिक शिक्षणाच्या पहिलीच्या पायरीवर चढणार आहे त्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला आहे शाळा व्यवस्थापनाकडून तयार केली जात आहे.

## थोडक्यात



### घोलपवाडी येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

घाटनांदुर : येथून जवळ असलेले घोलपवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्य ३०० व्या जयंती निमित्त घोलपवाडी येथे ८ जून रविवार रोजी सकाळी ९ वा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समिती घाटनांदूर चे अध्यक्ष परमेश्वर वैद्य यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले यावेळी ,मल्हार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप भैय्या वैद्य, कैलास पुरणे, दत्ता सोनटक्के,माणिक दोडे, रमेश चौंडे, केशव चौंडे, त्र्यंबक दोडे,दीपक चौंडे, परमेश्वर चौंडे,अशोक चौंडे, हरिराम भुसनर, विजय निळे, गणेश दोडे, बालासाहेब मानवतकर, अर्जुन मुलगीर, अजय निळे,रावसाहेब दोडे, व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाल्यांची साफ सफाई करा-जावळे

पाटोदा। प्रतिनिधी

पावसाळा सुरू होण्यापूर्वी पाटोदा नगरपंचायतीने शहरातील सर्व नाल्यांची तातडीने सफाई करावी, अशी मागणी युवानेते दादा जावळे यांनी केली आहे. दरवर्षी पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे रस्त्यांवर पाणी साचते, वाहतूक कोंडी होते आणि नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. यामुळे पाटोदा शहरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यामुळे दादा जावळे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे की, पाटोदा''नगरपंचायतीने पावसाळ्यापूर्वीच शहरातील नाल्यांची स्वच्छता करून घ्यावी. यामुळे पावसाळ्यात होणाऱ्या समस्यांपासून नागरिकांना वाचवता येईल.'' पाटोदा नगरपंचायतीने याबाबत तातडीने कार्यवाही करून नाल्यांची सफाई करण्याची आवश्यकता आहे, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे युवानेते दादा जावळे यांनी सांगितले. यामुळे पावसाळ्यात होणाऱ्या समस्यांपासून नागरिकांना वाचवता येईल आणि शहरातील स्वच्छता राहिले

### स्वामी समर्थ केंद्रामध्ये बालसंस्कार

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा येथील श्री स्वामी समर्थ केंद्र मध्ये बालसंस्कार संपन्न झाले दर रविवारी केंद्रामध्ये बालसंस्कार होत असतात तरी पाटोदा शहरातील आपल्या पाल्यांना पालकांनी दर रविवारी केंद्रात बालसंस्कारासाठी आणावे असे स्वामी समर्थ केंद्र पाटोद्याच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे अखिल भारतीय दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ केंद्र नाशिक यांच्या संयुक्त योजना व मार्गाला जात असून आपल्या पाल्यांना पालकांना वेळ नसून पुढे आपली संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर आपल्या इथून पुढील पिढीला संस्काराची गरज असून काळाची पावले ओळखून श्री स्वामी समर्थ गुरु माऊली दिंडोरी प्रणित यांनी के बाल संस्कार सुरू केले बालकांचे आरोग्य मानसिक स्वास्थ्य उत्तम मालकाचे शारीरिक मानसिक स्वास्थ्य टिकवणे महत्त्वाचे असून पाटोदा शहरातील पालकांनी आपले बालके बालसंस्कार पाठवावीत असे श्री स्वामी समर्थ केंद्र पाटोदा च्या वतीने आवाहन करण्यात येत आहे

# शंभर वर्षापासून मोफत दमा औषधाचे वाटप करण्याची परंपरा कायम

जालना। प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही मंठा येथे दायमा परिवाराच्या वतीने रविवार (ता. ८) रोजी सकाळी सात वाजता दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात आले.मागील शंभर वर्षांपासून दायमा परिवाराच्या वतीने दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात येते. या परिवारातील तिसऱ्या पिढीकडून सध्या औषध वाटपाची परंपरा सुरू आहे.

सध्या या परिवारातील सोमनाथ दायमा, संतोष दायमा आणि पप्पू दायमा दमा असलेल्या रुग्णांना औषधीचे वाटप करतात. जून मधील मृग नक्षत्र व कोजागिरी पौर्णिमेला असे दोन वेळेस दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात येते. ही आयुर्वेदिक औषधी घेण्यासाठी मुंबई, ठाणे, बार्शी, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, चिखली, बुलढाणा, परभणी व परतुर -



मंठासह जालना जिल्ह्यातील रुग्ण मोठ्या संख्येने येतात. यावर्षीपासून रुग्णांची वाढती संख्या पाहता श्री रेणुका देवी मंदिर परिसरात औषधीचे वाटप करण्यात आले. औषधी वाटप करण्यासाठी उमेश दायमा, संतोष तिवारी, दिनेश दायमा, गोविंद दायमा, कपिल तिवारी, गोपाल दायमा, शुभम दायमा, सौरभ दायमा, कृष्णा चिंचणे, रमण दायमा, अनुराग कासट, सोमेश चोकडा, यश तिवारी, सुदर्शन भुतडा, मधुर मणियार, संजय बोराडे जय दायमा, खुशी दायमा यांनी परिश्रम घेतले. दमा रुग्णांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नगराध्यक्षा सौ वंदनाताई वैजनाथ बोराडे यांनी केली. रात्री मुक्कामाची व्यवस्था व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बालासाहेब बोराडे यांनी श्री अनुसया माता मंदिर सभागृहात केली. तसेच प्रतिष्ठित किराणा व्यापारी मोहनसेठ गोयल यांनी फराळाची उत्तम व्यवस्था केली होती.

# पाटोदा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात



पाटोदा। प्रतिनिधी

दिनांक ६ जून रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पाटोदा येथे शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात व राष्ट्रप्रेम जागवणाऱ्या वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेत कुटुंब प्रबोधन, नागरिक कर्तव्य व शिष्टाचार, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी विचार व संकल्पना, सामाजिक समरसता अशा विविध प्रेरणादायी विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून अतुल घोरट सर, सौ.सत्यभामा ताई चोले मॅडम, राजेंद्र गोरे सर, आबासाहेब हांगे सर, श्रीमती सुरेखाताई खेडकर मॅडम व अशोक बांगर सर यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे प्राचार्य व्ही.एस. बेलेकर यांनी भूषवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पनिदेशक शेख सर यांनी तर आभारप्रदर्शन बेद्रे सर यांनी केले. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने, संस्थेतून प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करणाऱ्या यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांनी आपले स्टॉल्स उभारले होते. यामुळे सध्या प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरतेची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमात विविध नवीन उपक्रमांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी श्रीमती पाळवदे मॅडम, माने सर, दराडे सर, वाकपांजर सर, स्वामी सर, पाटील सर, पाचंगे सर, जगताप सर, तसेच सदस्य मोहन सोनवणे सर यांनी मोलाचे सहकार्य केले. हा कार्यक्रम संस्थेच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनाची साक्ष देणारा ठरला.

# धानोरा खुर्दच्या ग्रामसेवकपदी प्रमोद जोगदंड यांची नियुक्ती

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द ग्रामपंचायत च्या तात्कालीन ग्रामसेवक तन्वीर शेख यांच्या मनमानी कारभाराला सरपंचासह गावातील नागरिक वैतागले होते.अखेर तन्वीर शेख यांच्या बदलीचे आदेश निघाले असुन त्यांच्या जागी प्रमोद जोगदंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंच पार्वती पौळ यांनी गेल्या चार ते पाच महीन्या पासुन ग्रामसेवक शेख यांच्या मनमानी कारभारावर आक्षेप घेऊन बी.डी.ओ. पंचायत समिती अंबाजोगाई यांच्या कडे सरपंच पार्वती पौळ यानी रीतसर तक्रार देऊन ग्रामसेवक तन्वीर शेख यांच्या बदलीची मागणी केली होती . आणि आखेर धानोरा खुर्दच्या महीला सरपंच पार्वतीबाई पौळ यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असुन तात्कालीन ग्रमसेवक तन्वीर शेख यांच्या बदलीचे आदेश निघाले असुन त्यांच्या जागी प्रमोद जोगदंड यांनी धानोरा खुर्द ग्रामपंचायत चा



ग्रामसेवक म्हणुन पदभार स्वीकारला आहे.

या वेळी गावातील ग्रामपंचायत सदस्य गावातील नागरीक यांच्या कडुन नवीन रूजु झालेले ग्रामसेवक प्रमोद जोगदंड यांचा गावच्या वतीने सत्कार करण्यात आला . यावेळी सरपंच पार्वती महादेव पौळ, उप सरपंच बालासाहेब गुणाले,दिलीपराव ढगे, रज्जाक पटेल,उमेश कासले रहेमान पटेल , सामाजिक कार्यकर्ते नाना ढगे , पत्रकार ताहेर पटेल, बालासाहेब ढगे , महेश साबळे ,सय्यद लायक, शेख सद्दाम ,बाळासाहेब जगताप,शिवनारायन ढगे, दत्ता पौळ,सय्यद आस्लम, दिनकर साबळे, हे उपस्थीत होते.

# तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयास नॅक 'बी' ग्रेड

बीड।प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात सातत्याने गुणवत्ता आणि प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या देवगिरी प्रतिष्ठाण संचालित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयांने राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) कडून 'बी' ग्रेड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विशेष बाब म्हणजे हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित असूनही गुणवत्तेचे निकष पूर्ण करताना हे मानांकन मिळवण्यात यशस्वी ठरले आहेत. दिनांक २६ व २७ मे २०२५ रोजी नॅक समितीने महाविद्यालयास ऑनलाइन भेट देऊन संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि पायाभूत सुविधांचा सखोल आढावा घेतला. विविध निकषांवर बारकाईने परीक्षण केल्यानंतर, समितीने महाविद्यालयास २.१३ सीजीपीए स्कोअरसह 'बी' ग्रेड मानांकन प्रदान केले आहे. हे मानांकन ०६ जून २०२५ पासून पुढील पाच वर्षांपर्यंत वैध राहणार आहे.

या उल्लेखनीय यशामागे संस्थेचे संचालक प्रा. डॉ. प्रदीप रोडे यांची दूरदृष्टी, अभ्यासू दृष्टिकोन आणि प्रभावी नियोजन या सर्व घटकांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या कुशल



मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय शिस्त आणि सर्वांगीण प्रगतीकडे भक्कम पावले टाकली आहेत. तसेच, या वाटचालीत मा. प्राचार्य प्रो.डॉ.आर. टी.देशमुख, प्राचार्य प्रो.डॉ. मिलिंद पंडित, प्रो.डॉ. मनोहर शिरसाट, प्रो.डॉ. उत्तम साळवे, विनोद किर्दक यांचेही सातत्यपूर्ण मार्गदर्शन व सहकार्य लाभले. याशिवाय, प्राचार्य डॉ. एल. एम. थोरात, उपप्राचार्य.डी.जी. निकाळजे आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. योगिता लांडगे यांचे सक्षम नेतृत्व महत्त्वाचे ठरले. तसेच क्रायटेरिया चेअरमन प्रा. विवेक जोगदंड, प्रा. अंकुश सुर्वे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा. सुरेश कसबे, डॉ. मनीषा उजगरे, प्रा. शिल्पा बोराडे, डॉ. विकास वाघमारे यांचे मोलाचे योगदान उल्लेखनीय आहे. वेबसाईट व सपोर्ट युनिटचे प्रतिनिधी प्रा. भारत उघडे, प्रा. मगन ओव्हाळ, प्रा.राहुल सोनवणे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या अत्यंत काटेकोरपणे पार पाडत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.या यशामुळे संस्थेच्या परिसरात आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अंबाजोगाईत नि:शुल्क करिअर ,गायडन्स सेमिनार मार्गशर्दन

## नालंदा फाऊंडेशन व आई फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम ;गुणवंतांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत रविवार, दिनांक १५ जुन २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि गुणवंतांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. खास आपल्या पाल्याच्या करिअरची दिशा ठरवून त्यातून यशस्वी व्यक्तिमत्व बनविण्यासाठी आवश्य उपस्थित रहा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

इयत्ता १० वी, १२ वी, पदविका व पदवीनंतर पुढे काय ? असा प्रश्न विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना नेहमीच पडतो. अशावेळी आपल्या पाल्याला व आपल्या स्वतःला जर निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर किती बरे होईल. म्हणून हाच विधायक हेतू व सकारात्मक विचार करून नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत रविवार, दिनांक १५ जुन २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि इयत्ता १० वी, १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदिप रोडे सर (संस्थापक, नालंदा फांऊडेशन, बीड.) हे असणार आहेत. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रशासकीय सेवेत ज्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत लोकहिताला नेहमीच प्राधान्य दिले असे प्रशासकीय अधिकारी रविंद्र जोगदंड (वर्ग - १ उपायुक्त स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगर.) व दिपक वजाळे (वर्ग - १ उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई.) आणि प्रभावी करिअर मार्गदर्शक म्हणून सर नागेश जोंधळे (संस्थापक, आई सेंटर प्रो तथा प्रेरणादायी वक्ते) तसेच यावेळी राजेंद्र घोडके (सामाजिक कार्यकर्ते), अभ्यासक व तज्ज्ञ ॲड.राहुल बनसोडे (नाशिक) या मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तरी अंबाजोगाई शहर, परिसर आणि तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षण क्षेत्रात कार्यरत मान्यवर यांनी खास आपल्या पाल्याच्या करिअरची दिशा ठरवून त्यातून त्यांना यशस्वी व्यक्तिमत्व बनविण्यासाठी आवश्य उपस्थित रहावे. तसेच गुणवंत विद्यार्थी व पालकांनी नोंदणीसाठी पुढील मोबाईल क्रमांकांवर तात्काळ संपर्क ( ९४०४६४३९४४ / ९९७५३०६१५६ ) साधावा असे आवाहन संयोजक, सर्व सन्माननीय सदस्य नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**टीसी हरवला आहे**

**दिलीप दिगांबर नागरगोजे या नावाचा बीएससी टीवाय पासचा टीसी दि. ३१ मे रोजी बलभीम चौक ते साठे चौक प्रवासादरम्यान हरवला आहे तरी कोणाला सापडल्यास सपंर्क साधावा.**

**संपर्क ९४२११७०९८१**

# रविशंकर विद्या मंदिर येथे शिवराज्याभिषेक सोहळा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळा दि. ६ जून २०२५ बीड रविशंकर विद्या मंदिर येथे शवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी सुप्रिया वाघ व शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी यांनी प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी राज्याभिषेकाबद्दल विस्तृत माहिती शाळेतील शिक्षिका अनिता भालेराव यांनी सर्वांना दिली.सध्या रविशंकर विद्यामंदिर येथे सध्या श्रद्धा कोर्स सुरू आहे या कोर्स दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्याचा कार्यक्रम देखील घेण्यात आला या वेळेला श्रद्धा कोर्स घेणार्या सुप्रिया वाघ यांनी व मुख्याध्यापक अनिता सुर्यवंशी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण कोल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका पूजा लांडे यांनी केले तर यावेळी शाळेतील शिक्षिका अपूर्वा कुलकर्णी यांनी राज्याभिषेकावर आधारित एका कवितेचे सादरीकरण केले. या सोहळ्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद सहकारी वृंद उपस्थित होते.

# चाकरवाडीतील शिवमहापुराण कथेला ना. पंकजाताई मुंडेंची भेट ; कथा श्रवणासोबत आरतीत घेतला सहभाग

## माऊली महाराजांचे कार्य आजही समाजाला दिशादर्शक

**केज । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान संत, ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यस्मरणानिमित्त चाकरवाडीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा सोहळ्याला आज प्रारंभ झाला. या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून दर्शन, कथाश्रवण व शिवमहापुराण कथेच्या आरतीत सहभाग घेतला.**





ना.पंकजाताई मुंडे यांनी या दिव्य सोहळ्याला भेट देऊन महाराजांचे दर्शन घेतले, तसेच पं. प्रदीप मिश्रा यांच्या प्रभावी शैलीतील शिवमहापुराण कथेतील आरतीत सहभागी होत, हजारो भाविकांबरोबर भक्तिभावाने या वातावरणात रममाण झाल्या.या वेळी महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी पंकजाताईंचे या सोहळ्यात औपचारिक स्वागत केले. २० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर महाराजांच्या विचारांचे स्मरण करताना पंकजाताईंनी सांगितले की, बीड जिल्ह्यात संत ज्ञानेश्वर माऊलींनी सामाजिक आणि अध्यात्मिक परिवर्तनाचा जो मार्ग दाखवला, तो आजही आपल्याला प्रेरणा देतो. त्यांच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळाली आणि एकात्मतेचा संदेश पसरला.ही श्रद्धा आणि भक्ती हीच आपल्या संतपरंपरेची खरी ताकद आहे. अशा सोहळ्यांमधूनच समाजाला सकारात्मकता आणि एकोप्याचा संदेश मिळतो असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. शिवमहापुराण कथेचे कथाव्यास पं. प्रदीप मिश्रा यांचे दर्शन घेऊन पंकजाताई मुंडे यांनी आरतीमध्ये सहभाग घेतला.या कार्यक्रमास हजारो भाविक उपस्थित होते.

# टाकळी अमिया येथे श्री संत बाळूमामा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आज रविवार दिनांक ८/६/२०२५ रोजी आष्टी तालुक्यातील टाकळी (अमिया) येथे श्री संत बाळूमामा, मुळे महाराज व श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापणा ह.भ.प बबन महाराज बहिरवाल यांच्या शुभहस्ते व सर्व देवा ब्राम्हणांच्या साक्षीने हा सोहळा पार पडला यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती आष्टी/पा/शिरुर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुरेश (अण्णा) धस, माजी आमदार बाळासाहेब आजबे काका व या सोहळ्यास मराठा संघर्षयोद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांनी सुद्धा भ्रमणध्वनी द्वारे शुभेच्छा दिल्या व उपस्थित ह.भ.प संतोष महाराज मोरे, ह.भ.प निवृत्ती महाराज बोडखे, ह.भ.प मोहन महाराज आमटे, ह.भ.प सुभाष महाराज बोरुडे, हभप गणेश महाराज सुडके, ह.भ.प अप्पा



महाराज सुंबरे टाकळी अमिया गावचे भूषण ह.भ.प दादा महाराज चांगूने, तसेच जिल्हा.प.सदस्य उध्दव बापू दरेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपा जिल्हा सरचिटणीस अजय दादा धोंडे, जिल्हा.प.सदस्य सतिष आबा शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रमजान शेठ तांबोळी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष सुनिल (दादा) नाथ, अण्णासाहेब चौधरी, अनिल तात्या ढोबळे, पत्रकार किरण पोकळे, अशोक ढवन, बबनराव औटे,जयसिंग गव्हाणे,संजय मेहेर, पी आय भुतेकर साहेब, ए.एन कन्स्ट्रक्शन बारामती अविनाश माने, शेरी गावचे सरपंच संदीप खाकाळ साहेब, युवा उद्योजक अशोक भोसले, शिवलिंग लगड, राजू काका शिंदे, जयंत देशमुख, सागर ढोबळे, सुरेश सोनवणे, विष्णू कुसळकर, प्रवीण बहिर उपस्थित होते यावेळी ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर शेंडगे सर यांनी केले व आभार अशोक दादा चौधरी व ज्ञानेश्वर दादा चौधरी यांनी मानले ह्या कार्यक्रमासाठी सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सर्व पंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच आणि श्री संत बाळूमामा यांचे भाविक भक्त हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केल्या प्रकरणातील तीन आरोपींचा जामीन फेटाळला -अॅड. तावरे

**बीड । प्रतिनिधी**

घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण प्रकरण घटना अशी की फिर्यादी कृष्णा माणिक बर्डे, रा. धामणगांव ता.आष्टी जि. बीड दिनांक १४/०५/२०२५ रोजी धामनगांव येथे पाऊस आल्याने मी ०८ वाजेच्या सुमारास सायंकाळी सुनिल नवनाथ बर्डे यांचे घरी असतांना आरोपी १) रामा बबन गायकवाड, २) महादेव विठ्ठल बर्डे, ३) बाबु बबन गायकवाड, ४) ब्रम्हा विठ्ठल बर्डे, ५) सुभाष रायभान बर्डे,६) विष्णू बर्डे हे सर्वजण सुनिलच्या घरी आले जुन्या भांडणाचे कारण काढून सुनिल नवनाथ बर्डे यांना म्हणाले की, तु घराबाहेर चल असं म्हणताच सुनिल बर्डेला घराचे बाहेर ओढले व त्याला मुंडक्याला धरून रामा बबन गायकवाड याने खाली पाडले तेवढ्यात तेथे लगेच ब्रम्हा विठ्ठल बर्डे त्याच्या हातातील धारधार चाकूने सुनिल च्या



डाव्या बाजुला पोटात मारून गंभीर जखमी केले व तेथे सुनिले हा बेशुध्द पडला. त्यानंतर कृष्णा बर्डे याला विष्णू विठ्ठल बर्डे, याने त्याचे हातातील धारधार तलवारीने कृष्णाच्या उजव्या गालावर मारून जखमी केले. तसेच महादेव विठ्ठल बर्डे याने व त्यांचे सोबत असलेले बाबु बबन गायकवाड, रामा बबन गायकवाड यादोघांनी कृष्णा व सुनिल बर्डे ला खाली पाडून शस्त्राचा धाक दाखवून लाथा बुक्कयाने व चापटाने मारहाण केली. यावर आमचे भांडण चालु असताना तेथे अचानक सुभाष बर्डे,विष्णू बर्डे यांनी त्यांचे हातात लाकडी दांडे घेवून त्या दोघांनी कृष्णाला व सुनिल बर्डे ला पाठीत व कंबरावर मारहाण केली वरील आरोपी क्र. १ ते ६ यांनी कृष्णा बर्डे व सुनील बर्डेला शिवीगाळ करून तलवार,चाकू,लाकडी दांडेने जिवे मारण्याच्या उद्देशाने केलेल्या मारहाण प्रकरनी अंभोरा पोलिस स्टेशन ता.आष्टी जि. बीड भारतीय शस्त्रास्त्र(–ठच– –उढ)कायद्याच्या कलम ४,२५ व भारतीय न्यायाच्या कलम ११८(२), ११८ (१), १८९ (२), १९०, १९१ (३), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) इछड कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला सदर ६ आरोपी पैकी महादेव विठ्ठल बर्डे,ब्रह्मा ब्रह्मदेव विठ्ठल बर्डे, विष्णू विठ्ठल बर्डे यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. सदरील अर्जावर सुनावणी होवून सरकारी वकील नितीन राख व फिर्यादीचे वकील ड गणेश तावरे यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून ३ ही आरोपींचा मा. न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला नामंजूर केला फिर्यादी तर्फे ड. गणेश हनुमंत तावरे यांनी काम पाहिले

# औंढा नागनाथ येथून अपहरण झालेल्या इसमाची तेलगाव येथे सुटका

## तीन अपहरणकर्ते पोलीसांच्या ताब्यात ; दिंद्रुड पोलीसांची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०७/०६/२०२५ दुपारी १४.१५ वा. स्थागुशा बीड येथिल पोउपनि श्रीरम खटावकर यांनी दिंद्रुड पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे यांना माहिती दिली की, जवळा बाजर ता. औंढा नागनाथ येथुन एक इसमाचे अपहरण करण्यात आले असुन त्यास काही इसमानी ऐींळसर कार क्रमांक चक४४ –ए ११९१ मध्ये टाकुन घेउन गेले असुन त्यांचे लोकेशन पात्रुड ता. माजलगाव येथे आले आहे. त्यावेळी सोपनि ढाकणे यांनी तात्काळ पो. स्टे. दिंद्रुड येथिल पोशि २१७५ साळुंखे, पोशि ३६० गायकवाड, चापोशि १६७० बनसोडे अशांना तेलगाव येथे पाठवून नमुद वर्णनाच्या कारचा शोध घेण्याचे सांगीतले असता. पोलीस पथकाने दुपारी १५.१५ सुमारास तेलगाव येथे स्थानिक नागरीकांच्या मदतीने नमुद कार थांबवून





अपहरण झालेला इसम नामे बळिराम लिंबाजी सांवत तसेच अपहरण करणारे इसम नामे १) नामदेव माणिक घोळवे रा. अंबेवडगाव ता. धारुर, २) श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, परभणी ह.मु. जवळा बाजार ता. औंढानागनाथ जि. हिंगोली (३) बाबुराव गोविंदराव बडे रा. कसारी ता.धारुर अशाना त्यांचे कडील वाहन क्र. चक४४ –ए ११९१ सह ताब्यात घेवुन पो.स्टे. दिंद्रुड येथे आणले. चौकशीनंतर समजले की पैशाच्या व्यवहारातून यातील आरोपी श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, ◀◀ पान ३ वर

# स्वच्छ भारत, उज्वला, जनधन जीएसटी यांसारख्या योजनांनी देशात परिवर्तन झाले -आ. बबनराव लोणीकर

जालना प्रतिनिधी

भाजपाने गेल्या ११ वर्षांत आर्थिक सुधारणा, पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती आणि सामाजिक कल्याण योजनांद्वारे भारताच्या विकासाला गती दिली आहे. स्वच्छ भारत, उज्ज्वला, जनधन आणि जीएसटी यांसारख्या योजनांनी देशात परिवर्तन घडवले. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूरचे आ. बबनराव लोणीकर यांनी केले. ते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारच्या ११ यशस्वी वर्षांच्या कार्यकाळानिमित्त जालना येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात ०८ जून २०२५ रोजी आयोजित ''संकल्प से सिद्धि तक'' जिल्हास्तरीय कार्यशाळेत माजी मंत्री आणि परतुर मतदारसंघाचे आ. बबनराव





लोणीकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत त्यांनी संघटन कौशल्य आणि भारतीय जनता पक्षाने देशभरात केलेल्या विकास कामांवर प्रकाश टाकला या वेळी ते बोलत होते. यावेळी श्री लोणीकर यांनी जाहीर केले आहे की भारतीय जनता पक्ष (भाजप) जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत पूर्ण ताकदीने लढेल. या विधानातून त्यांनी पक्षाच्या निवडणूक रणनीती आणि जालना जिल्ह्यातील राजकीय सक्रियतेचा आक्रमक दृष्टिकोन दर्शविला आहे. लोणीकर यांच्या या वक्तव्यातून भाजप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली पकड मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट होते. पुढे बोलताना आ. बबनराव लोणीकर म्हणाले की जीएसटी २०१७ मध्ये लागू झालेल्या जीएसटीमुळे करप्रणाली सुलभ झाली. करदात्यांची संख्या जवळपास दुप्पट झाली असून, एप्रिल २०२३ मध्ये जीएसटी संकलन १.८७ लाख कोटी रुपये इतके विक्रमी उच्चांक गाठले. मेक इन इंडिया वर बोलताना आमदार लोणीकर म्हणाले २०१४ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने उत्पादन क्षेत्राला चालना दिली. सारख्या कंपन्यांनी भारतात उत्पादन युनिट्स स्थापन केली, ज्यामुळे रोजगार निर्मिती आणि परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळाले. आत्मनिर्भर भारत वर आमदार लोणीकर यांनी मत मांडले की स्वावलंबी भारतासाठी





**बीड : छत्रपती संभाजीनगर येथील सिडको भागातील त्रिदेवता मंदिराच्या महिला योग वर्ग टीम बीड येथे दि. ८ जून २०२५ रोजी आल्या असता त्यांचे स्वागत करताना योगशिक्षक डॉ. संजय तांदळे दिसत आहेत.**

# अखेर धानोरा खुर्दच्या ग्रामसेवक तन्वीर शेख यांची बदली, ग्रामसेवक प्रमोद जोगदंड यांची नियुक्ती



अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द ग्रामपंचायत च्या तात्कालीन ग्रामसेवक तन्वीर शेख यांच्या मनमानी कारभाराला सरपंचासह गावातील नागरिक वैतागले होते.अखेर तन्वीर शेख यांच्या बदलीचे आदेश निघाले असुन त्यांच्या जागी प्रमोद जोगदंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंच पार्वती पौळ यांनी गेल्या चार ते पाच महीन्या पासुन ग्रामसेवक शेख यांच्या मनमानी कारभारावर आक्षेप घेऊन बी.डी.ओ. पंचायत समिती अंबाजोगाई यांच्या कडे सरपंच पार्वती पौळ यानी रीतसर तक्रार देऊन ग्रामसेवक तन्वीर शेख यांच्या बदलीची मागणी केली होती . आणि आखेर धानोरा खुर्दच्या महीला सरपंच पार्वतीबाई पौळ यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असुन तात्कालीन ग्रमसेवक तन्वीर शेख यांच्या बदलीचे आदेश निघाले असुन त्यांच्या जागी प्रमोद जोगदंड यांनी धानोरा खुर्द ग्रामपंचायत चा ग्रामसेवक म्हणुन पदभार स्वीकारला आहे.

या वेळी गावातील ग्रामपंचायत सदस्य गावातील नागरीक यांच्या कडुन नवीन रूजु झालेले ग्रामसेवक प्रमोद जोगदंड यांचा गावच्या वतीने सत्कार करण्यात आला . यावेळी सरपंच पार्वती महादेव पौळ, उप सरपंच बालासाहेब गुणाले,दिलीपराव ढगे, रज्जाक पटेल,उमेश कासले रहेमान पटेल , सामाजिक कार्यकर्ते नाना ढगे , पत्रकार ताहेर पटेल, बालासाहेब ढगे ,महेश साबळे ,सय्यद लायक,शेख सद्दाम,बाळासाहेब जगताप,शिवनारायन ढगे,दत्ता पौळ,सय्यद आस्लम,दिनकर साबळे ,हे उपस्थीत होते.

## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदाय

# माऊली दादांच्या जयघोषात शिवमहापुराण कथेस सुरुवात

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यात प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदायांच्या उपस्थित. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळयास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व ह.भ.प. नारायण महाराज भाऊ यांच्या हस्ते शिवमहापुराण ग्रंथ पूजन करण्यात आले.पंकजाताई मुंडे पर्यावरण मंत्री व पशुसंवर्धन मंत्री चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली .**



तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी शिवमहापुराण कथेस व माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास आलेल्या भाविक भक्तांना आशिर्वाद दिले. सर्वांनी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळयात नामस्मरण, अभंग संकीर्तन,शिवमहापुराण कथेचा लाभ घ्यावा असे महादेव महाराज तात्या यांनी आव्हान केले .सद्गुरु संत ज्ञानेश्वर माऊली दादाच्या जय जय घोष व हर हर महादेव जय घोषणे आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली . महाराष्ट्रातील भक्तीच माहेरघर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली पहिल्याच दिवशी भाविक भक्तांचा महापूर चाकरवाडी येथे आला , सुमारे ३ लाख पेक्षा अधिक जनसागर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस उपस्थित होते . संत महंतांच्या उपस्थितीत शिवमहापुराण कथेस तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा सुरू झाली पुढील सात दिवस शिव महापुराण कथा सुरू राहणार आहे भाविक भक्तांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सर्व शासकीय कार्यालयत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार -मुख्यमंत्री फडणवीस

पुणे: राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



पुण्यातील महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे ,खासदार मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे ,भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी उपस्थित होते. (डरींशिीं झींपश छ्शुा)

मुख्यमंत्री म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दीष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल.

हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी, महाऊर्जाची ही नवी इमारत म्हणजे हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे.

गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सौर ऊर्जेच्या वापरामुळे वीजेचे दर कमी होणार...

फडणवीस यांनी सांगितले की,महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजीत पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे. कुसुम योजनेच्या अंमल बजावणीतही आपण पुढे आहोत. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत कृषीची संपूर्ण वीजेची मागणी सौर ऊर्जेवर परिवर्तित करू शकू. गेल्या २० वर्षात दरवर्षी वीजेचे दर ९ टक्क्याने वाढवत आहोत. २०२५ ते २०३० मध्ये दरवर्षी वीजेचे दर आपण कमी करणार आहोत.



# चिंता करू नका, मी कायम तुमच्या पाठीशी...; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सुप्रिया सुळेंनी दिला आधार

इंदापूर । प्रतिनिधी

इंदापूर तालुक्याच्या बऱ्याच भागात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. गोरगरिबांच्या घराचे नुकसान झाले आहे. अशा नुकसानग्रस्त कुटुंबांना शेतकऱ्यांना शासनाची मदत मिळण्यासाठी मी स्वतः लक्ष घालणार आहे. यासाठी पाठपुरावा देखील करणार आहे. अशी माहिती बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

खासदार सुप्रिया सुळे यांनी कळंब, कुरवली, सणसर, शेटफळगडे (ता. इंदापूर) येथील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूर तालुकाध्यक्ष तेजसिंह पाटील, कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, पुणे जिल्हा सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष सागर मिसाळ, अनिकेत निंबाळकर, ग्रामस्थ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना सुप्रिया सुळे यांच्यासमोर अश्रू आवरता आले नाहीत, त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आधार देत तुमच्या पाठीशी खासदार म्हणून मी कायम आहे. चिंता करू नका असाही शब्द पाहणी दौऱ्यात दिला.

# यंदा दगडूशेठ गणपतीला पद्मनाभ स्वामी मंदिराचा देखावा ; मंदिर सजावटीचे वासापूजन संपन्न

पुणे : पुण्यातील गणेशोत्सव फक्त देशात नाही तर जगामध्ये प्रसिद्ध आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाची बीजे पेरलेल्या पुण्यामध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यातील गणेशोत्सव सोहळा आणि विसर्जन मिरवणूक ही अत्यंत लोकप्रिय आहे. मानाचे गणपती आणि पुण्याचे आराध्य दैवत असलेल्या दगडूशेठ गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी लांबून भक्तगण येत असतात. दगडूशेठ गणपतीची आरास आणि डेकोकेशन हा नेहमी चर्चेचा विषय ठरतो.



पुण्यातील लोकप्रिय दगडूशेठ गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी बारामाही भाविक येत असतात. गणेशोत्सव काळामध्ये दगडूशेठ हलवाई गणपतीला केलेला भव्य देखावा हा नेत्रदीपक असतो. यंदा दगडूशेठ हलवाई गणपतीचे १३३ वे वर्षे आहे. या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने गणेशोत्सवानिमित्त केरळ मधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. त्या सजावटीच्या तयारी प्रारंभी वासापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वासा पूजनाने सजावटीचा श्री गणेशा झाला.

बुधवार पेठेतील उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे वासापूजन झाले. यावेळी वासाला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.भारतातील केरळ राज्याची राजधानी असलेल्या तिरुअनंतपुरम येथे भगवान विष्णूंना समर्पित असे एक हिंदू मंदिर म्हणजे पद्मनाभस्वामी मंदिर. हे मंदिर श्री वैष्णव परंपरेत श्री विष्णूंचे पवित्र निवासस्थान मानले जाणारे १०८ दिव्य देसमांपैकी म्हणजेच निवासस्थानांपैकी एक आहे. अत्यंत पवित्र असलेल्या या मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे साकारण्यात येत असून भाविकांकरीता विशेष आकर्षण ठरणार आहे.पद्मनाभस्वामी मंदिराच्या प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये ३० भव्य खांब असून ५०० देवी-दैवता, ऋषीमुनी यांच्या मूर्ती असणार आहेत. गाभारा सुवर्ण रंगाने सजलेला असून संपूर्ण छताचा भाग अष्टकोनी स्वरूपात साकारण्यात येईल. मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रीं चे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक विनायक रासकर यांनी मंदिराचे काम, मंडपव्यवस्था काळे मांडववाले यांनी केली आहे.

# ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार साताऱ्याला

पुणे: ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार असून, संमेलनआयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फाउंडेशनला मिळणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी दिली.




या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या सह सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे प्रतिधिनी उपस्थित होते. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित करण्यात आली होती.ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देऊन आली. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ, औदुंबर, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा इचलकरंजी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शाहूपुरी सातारा या संस्थांकडून निमंत्रणे आली होती.

या स्थळांना भेटी दिल्यानंतर स्थळ निवड समितीची बैठक रविवारी (दि. ८ जून) सकाळी पुणे येथे झाली. त्यात साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत स्थळ निवड समितीच्या निर्णयावर महामंडळाने एकमताने शिक्कामोर्तब केले.प्रा मिलिंद जोशी म्हणाले, साताऱ्याला ३२ वर्षानंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळाला आहे. यापूर्वी १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात संमेलन झाले होते. गेल्या १२ वर्षांपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाची संधी मिळावी यासाठी पाठपुरावा करत होती.

साताऱ्यातील ४ थे संमेलन

साताऱ्यात होणारे हे ४ थे संमेलन आहे. १८७८ मध्ये लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांनी ग्रंथकार संमेलन सुरु केल्यानंतर ३ रे संमेलन १९०५ साली रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात झाले होते. १९६२ मध्ये न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली ४४ वे तर १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले होते.

# वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेला रिक्षाचालकानं संपवलं; ओढणीने गळा आवळला, पुण्यात खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

बुधवार पेठेतील वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेचा निर्घुण खून झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या महिलेला दररोज बुधवार पेठेतील वेश्या वस्तीत सोडणाऱ्या रिक्षा चालकानेच ही हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी संबंधित रिक्षाचालकास अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या ५१ वर्षीय आरोपीचे नाव नितीन चंद्रकांत पंडित असे आहे. तो पुण्यातील सिंहगड रस्ता परिसरातील रहिवासी आहे. हत्या झालेल्या ४० वर्षीय महिलेचे नाव श्यामली असून ती धायरी येथील रायकर मळा परिसरात राहणारी होती. शनिवारी आरोपीने ओढणीने गळा आवळून तिची हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. घटना समोर आल्यानंतर नांदेड सिटी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्यानंतर गुन्हा नोंदवून आरोपीला तत्काळ अटक करण्यात आली आहे.

५० हजार रुपये घेतले उसणे

उधार दिलेल्या पैशांवरून झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे. श्यामली आणि आरोपी नितीन यांची पूर्वीपासून ओळख होती. श्यामली दररोज रात्री बुधवार पेठेतील वेश्या व्यवसायासाठी जात होती आणि नितीन तिची ने-आण करण्याची जबाबदारी पार पाडत होता. या कारणामुळे दोघांमध्ये मैत्री देखील निर्माण झाली होती. त्यांच्यातील ओळखीतून श्यामलीने नितीनकडून सुमारे ४० ते ५० हजार रुपये उसणे घेतले होते.

महिलेची ओढणीने गळा आवळून हत्या

नितीनने वारंवार पैसे मागूनही श्यामली ते परत करत नव्हती. त्यामुळे घटनेच्या दिवशी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. वाद टोकाला गेल्यानंतर नितीनने श्यामलीची ओढणीने गळा आवळून हत्या केली. बुधवार पेठेत वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलेची अशी निर्घृण हत्या झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. नांदेड सिटी पोलिसांनी आरोपी नितीन पंडितला तात्काळ अटक केली असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्याची मागणी

पुणे : महापालिकेकडून दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना भारतरत्न मौलाना अबूल कलाम आझाद आणि लोकशाहीर अण्णाभाऊसाठी शैक्षणिक अर्थसाह्य योजने अंतर्गत दहावीसाठी १५ हजार रुपये तर १२ वीसाठी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाते.

मागील १५ वर्षात या मदतीत एक रुपयाचीही वाढ करण्यात आलेली नाही या उलट महापालिकेचे उत्पन्न चार ते पाच पटीने वाढले आहे. त्यामुळे, प्रशासनाने यंदा पासून या शिष्यवृत्तीच्या रकेमत वाढ करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बाबतचे निवेदन नुकतेच नवनियुक्त महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना देण्यात आले.

गेल्या काही वर्षात उच्च शिक्षणाच्या खर्चात वाढ झालेली आहे. तसेच, व्यावसायभिमुख अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कातही वाढ झालेली आहे, अशा स्थितीत शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे, या मागणीचे निवेदन देताना महाराष्ट्र नागरिक कृती समितीचे सुरेश जैन, राष्ट्रवादीचे अजिंक्य पालकर, कॉंग्रेसचे अभिजित महामुनी, प्रशांत गांधी यावेळी उपस्थित होते.

# बाधित शेतकऱ्यांचे मंत्री गोरेंना साकडे

सासवड । प्रतिनिधी

पुणे-पंढरपूर महामार्गावरील वीर फाटा ते बोरवके मळ्यापर्यंतच्या माऊली विसावा पर्यंत भूसंपादन रखडले आहे. हा एक किलोमीटर लांबीचा रस्ता सन २०१३ पासून सुमारे १६ वर्षापासून प्रशासनाच्या ऊदासीनतेमुळे रखडला आहे.



याबाबत बाधित शेतकर्यांच्या वतीने मंत्री जयकुमार गोरेंना यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तुमच्या मागण्या सरकारकडे मांडणार आहे, असे आश्वासन गोरे यांनी बाधित शेतकर्यांना दिले.

यावेळी बाधित शेतकरी दामोदर रामभाऊ जगताप, भास्कर सुभानराव जगताप, ज्ञानेश्वर संताजी जगताप, उदयराज जयवंत जगताप, प्रमोद मधुकर बोरावके, सूर्यकांत रामचंद्र गिरमे, शत्रुघ्न पंढरीनाथ जगताप, अनिल मारुती गिरमे, अरुण सुभानराव जगताप, राजेंद्र दत्तात्रय बोरावके, कुमार मारुती जगताप, संतोष सुधाकर गिरमे, प्रदीप काशिनाथ राऊत, बाळासाहेब गेनबा बोरवके आदी उपस्थित होते. आळंदी ते पंढरपूर ९६५ क्रमांकाच्या पालखी महामार्गाचे काम पुर्णत्वास जात असताना सासवड हद्दीतील या एक किलोमीटरचा रस्ता शासनाच्या उदासीनतेमुळे होवू शकला नाही. या मार्गाने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा जात असतो. सन २०१३ मध्ये चौपदरी रस्ता बांधकामचे काम मंजूर होते. रस्त्याचे भूसंपादन झाले परंतु लागणारा निधी उपलब्ध न झाल्याने तसेच स्थानिक शेतकर्यांच्या विरोधामुळे काम पूर्ण झाले नाही.

# मेजर सुनील शिंदे यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

मंचर : अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील सुपुत्र मेजर सुनील सोनबापू शिंदे यांना सायंकाळी शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. भारतीय लष्कराच्या वतीने त्यांना ध्वजाच्छादन व तीन तोफांची मानाची सलामी देण्यात आली. गावात शासकीय इतमामात झालेला हा पहिलाच अंत्यसंस्कार असल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती.




पार्थिवावर भारतीय तिरंगा ध्वज आच्छादित करण्यात आला होता. सुशोभित रथातून निघालेल्या अंत्ययात्रेत गावातील वारकरी संप्रदायाच्या भजनी मंडळाने गजर करत पुढाकार घेतला होता. वैकुंठ भूमीवर आच्छादित केलेला ध्वज पत्नी सारिका यांच्याकडे लष्करातील अधिकाऱ्यांनीप्रदान केला.. त्यानंतर जवानांनी बंदुकींच्या सलामीने शिंदे यांना अंतिम मानवंदना दिली. कुटुंबीयांचा आक्रोश अनावर झाला होता.

अंत्यविधीसाठी लष्कराच्या वतीने मेजर परमहेंद्रसिंह आणि मेजर सुमन सिंह यांनी पुष्पचक्र अर्पण करून शोक व्यक्त केला. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच वैभव वायाळ, उपसरपंच प्रवीण भोर, धोंडीभाऊ महाराज शिंदे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेश भोर , बाळासाहेब बाणखेलेआदी मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. या प्रसंगी गावातील नागरिक, विविध संस्थांचे प्रतिनिधी, लष्करी अधिकारी, मित्रपरिवार आणि शिंदे कुटुंबीय यांच्या उपस्थितीत अंत्यविधी पार पडला.

# लोणावळ्यातील भुशी धरणात मोठी दुर्घटना !

## दोन तरुणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

लोणावळा : पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळ्यातील भुशी धरणात रविवारी (दि. ८) दुपारी दोनच्या सुमारास एक दुर्दैवी घटना घडली. उत्तर प्रदेशातील दोन तरुण पर्यटक मोहम्मद जमाल आणि साहिल शेख यांचा धरणाच्या बॅकवॉटर परिसरात पाण्यात बुडून मृत्यू झाला. हे दोघेही मूळचे मिरजापूर, उत्तर प्रदेश येथील रहिवासी असून, सध्या पुण्यातील थेरगाव येथे कामानिमित्त राहत होते. ते त्यांच्या आठ सहकाऱ्यांसह वर्षाविहारासाठी भुशी धरणावर आले होते.



घटनास्थळी जाण्यास रेल्वे विभागाने तारांचे कंपाउंड लावून बंदी घातली असली, तरी काही उत्साही पर्यटकांनी कंपाउंड तोडून मार्ग बनवला होता. या मार्गाने गेलेल्या दोन तरुणांना ही दुर्घटना भोवली. घटनेची माहिती मिळताच लोणावळा शहर पोलीस, शिवदुर्ग मित्र चे आपत्कालीन पथक आणि स्थानिक तरुणांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनंतर दोन्ही तरुणांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले. पावसाळ्यात भुशी धरण पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरते, परंतु अशा घटनांमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

लोणावळ्याचे प्रमुख पर्यटनस्थळ असलेले भुशी धरण सध्या ८० ते ८५ टक्के भरले असून, ते ओव्हरफ्लो होण्याच्या उंबरठ्यावर आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. यंदाच्या पावसाळ्यात धरण ओव्हरफ्लो होण्याच्या अपेक्षेने या वीकेंडला मोठ्या संख्येने पर्यटक धरणावर दाखल झाले. धरण पूर्णपणे भरले नसले, तरी निसर्गरम्य वातावरण आणि साचलेल्या पाण्यामुळे पर्यटकांनी समाधान व्यक्त केले. येत्या आठवड्यात पाऊस कायम राहिल्यास पुढील वीकेंडपर्यंत धरण पूर्णपणे ओव्हरफ्लो होण्याची शक्यता आहे